नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

₹ 3000* पर्यंत डिस्काउंट

₹12000* पर्यंतचे विशेष फायदे (स्कूटर्सवर)

कमी डाउन पेमेंट ₹ 1999*

निवडक कार्ड्सवर कॅशबॅक ₹5000*

शुभ मुहूर्त ऑफर्स अनलॉक करण्यासाठी स्कॅन करा

98980 51581

रजि नं. १९४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, सोमवार दि. ०७.१०.२०२४ | अंक नं. १८५ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

यंदा दिवाळी राजपाल सोबत
खरेदी मस्त..बक्षिसे जबरदस्त!

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™

संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

पीव्हीसी कारपेट, उडन स्ट्रीप-फ्लोरिंग, वॉलपेपर, वेलवेट कारपेट, गालिचा, रोमन-रोलर- व्हर्टिकल्स - क्लॉथ कर्टन्स व कर्टन्स फिटिंग, सोफा व सोफा मटेरियल,मॅट, मॅटिंग, रबर मॅट, सॉफ्ट - हार्ड मॅट, ग्रीन ग्रास, हिरवी जाळी, मच्छर जाळी, प्लास्टिक मॅट-चटई, कुशन्स-पिलोज, बेडशीट, ब्लँकेट, सोफा कव्हर्स, योगा मॅट, क्लिनिंग मटेरियल

गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या.केडगाव

मुदत ठेव	व्याजदर
३० दिवसानंतरिता	८ %
४६ दिवस ते ९० दिवस	९ %
९१ दिवस ते ३६५ दिवस	१० %
१२ महिने ते १७ महिने	१०.५० %
१८ महिन्याच्या पुढे	११ %
मासिक ठेव (संचित मुदत ठेव)	८%
दैनंदिन ठेव (बिंदुनामर ठेव)	२.५०%
व्यावीगत सेविंग्ज ठेव (द.सा.द.गे)	१%

आपल्या विश्वासासी भैरवनाथ पतसंस्था केडगाव, नगरकरांच्या सेवेत घेऊन येत आहे
सुवर्ण कर्ज व ठेव योजना
सर्व ठेवी ज्येष्ठ नागरिक ०.५०% (अर्धा टक्का व्याज) जादा

Sintex PVC DOORS
Ideal for Bathroom Toilet & Kitchen
BHINGARWALA ENTERPRISES
Near Swastik Chowk, Station Road. Ahmednagar. Mob 9422224990

परिमल मंदिर, बेंगलोर ची सुवासिक सुषमावर !
घरी आणा लाभच...लाभ
शुभलाभ ६ इन वन १२० ग्रॅम झीपर पाऊच
फक्त रु. ५० चा रु. 50 मध्ये
भारतवासी, मोमेन्टस, इंडियन कस्तुरी,केशर चंदन,खस(वाळा),लु बर्ड,यात्रा, अगरबत्तीचे जिल्हा वितरक व कापूर, ऊद, धुप, शेंदूर,अत्तर होलसेल व रिटेलसाठी
केवल अगरबत्तीं हॉटेल रसरंग समोर, आडते बाजार, अ.नगर. ☎ २३५८०५०
तसेच ३ फुट पासुन पुढे अल्युमिनीयम लॅंडर (शिडी) उपलब्ध

फ्लॅट विकणे
3 BHK फ्लॅट योग्य किंमत आल्यास विकणे आहे. फूल फर्निचर सिव्हिल हडको, अ.नगर
9637109227

आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

अहिल्यानगर नामांतराच्या अंमलबजावणीला महापालिकेकडून सुरूवात

अहमदनगर महापालिकेच्या जुन्या इमारतीसह प्रभाग समित्यांच्या फलकांवरील नाव आता 'अहिल्यानगर महानगरपालिका'

नगर – ऐतिहासिक अहमदनगर शहराचे नाव आता 'अहिल्यानगर' झाले असून, नामांतराच्या अंमलबजावणीला महापालिकेकडून सुरूवात झाल्याचे ६ ऑक्टोबरपासून दिसून आले. जुन्या महापालिकेच्या ठिकाणी 'अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर' असा स्वागताचा फलक लावण्यात आला आहे. दरम्यान, पुढील आठ दिवसांमध्ये नामांतराच्या अंमलबजावणीची प्रक्रिया पूर्ण होईल, असे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

अहमदनगरचे अहिल्यानगर करण्यास केंद्र सरकारने मान्यता दिल्यानंतर शुक्रवारी (दि.४) राजपत्र प्रसिध्द केले गेले. मात्र नामांतराची अंमलबजावणी संदर्भात पुढील प्रक्रिया स्थानिक प्रशासनाकडून करण्यात येणार आहे. याची सुरूवात रविवारपासून झाल्याचे दिसून आले. जुन्या महानगरपालिकेचा स्वागत फलक रविवारीच बदलण्यात आला होता. त्या ठिकाणी 'अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर' असा फलक लावण्यात आला आहे.

शहरात सर्वत्र अहिल्यानगर नावाचे फलक लावण्यासाठी प्रक्रिया सुरू झाली आहे. नामांतराच्या अंमलबजावणीची प्रक्रिया पूर्ण करण्यास पुढील आठ दिवस लागतील, असे आयुक्त डांगे यांनी सांगितले. दरम्यान, शहरात महानगरपालिकेकडून ही प्रक्रिया केली जात असली तरी जिल्हा व तालुक्याचे नाव बदलण्याबाबत महसूल विभाग नोटिफिकेशन काढेल व त्यानंतर पुढील प्रक्रिया केली जाणार आहे. आतापर्यंत शहरातील महानगरपालिकेच्या संरक्षक भिंतीवरील स्वच्छ सर्वेक्षण माहिती फलक, केडगाव उपकार्यालय, प्रभाग समिती चार बुरूडगाव, आरोग्य केंद्र, प्रभाग समिती कार्यालय माळीवाडा, भोसले आखाडा येथील कार्यालयांवरील शहराचे नाव बदलून अहिल्यानगर लिहिले आहे.

भिंगार छावणी परिषदेचेही नामांतर अहिल्यानगर छावणी परिषद करा

नगर – अहमदनगर शहराच्या अहिल्यानगर नामांतरास केंद्र व राज्य सरकारने मुकतीच परवानगी दिली आहे. त्यानुसार महापालिकेने नामांतराचे स्वागत करून अहमदनगर महानगरपालिकेचे अहिल्यानगर महानगरपालिका असे नामांतर करून सुधारित नावाचे फलक कार्यालयात लावले आहेत. त्यामुळे अहमदनगर छावणी परिषदेने सुद्धा महापालिकेप्रमाणे सुधारित नामांतर करून अहिल्यानगर छावणी परिषद असे फलक सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात लावण्यात यावेत, अशी मागणी शिवसेना भाजपा पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने छावणी परिषदेचे मुख्याधिकारी विक्रांत मोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या मागणीचे निवेदन भाजप शहर जिल्हा सरचिटणीस महेश नामदे व मिंगार शिवसेना शहरप्रमुख सुनील लालबोंद्रे यांनी छावणी परिषदेचे मुख्याधिकारी विक्रांत मोरे यांना दिले. यावेळी भिंगार भाजपचे अध्यक्ष श्याम बोळे, माजी नगरसेवक संजय झंजाणी, माजी नगरसेवक रवींद्र लालबोंद्रे, शुभांगी साठे, दामोदर माखीजा, उपाध्यक्ष राजीव दहीहंडे, सरचिटणीस आप्पासाहेब हंबे, बाळासाहेब धाकतोडे, सचिव रूपेश पल्हे, संजय फुलारी, युवा मोर्चा अध्यक्ष प्रज्योत लुणीया, श्रीगोपाल जोशी, राम झिंजे, संजय पांढरे आदी उपस्थित होते.

यावेळी विक्रांत मोरे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत यासाठी लवकरच छावणी परिषदेच्या बैठकीत नामांतराचा ठराव करून तो संरक्षण खात्याकडे पाठवू असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले. यावेळी भिंगार शहरातील विविध नागरी समस्यांच्या तक्रारीचा पाढा पदाधिकाऱ्यांनी त्यांच्यासमोर वाचला व त्या सोडवण्यासाठी तातडीने उपाययोजना राबवण्याची मागणी केली. (छायाचित्र पान २ वर)

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

राजमोती साबुदाना
एक्स्ट्रॉ सुपरफाइन साबुदाना
• इन्स्टंट साबुदानासुद्धा उपलब्ध!
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
नवरात्र उत्सवातील उपवासांकरिता
१ किलो । ५०० ग्रॅम । २५० ग्रॅम
VEGETARIAN
RAJ MOTI
-: स्टॉकिस्ट :-
मे. कांतीलाल घेवरचंद शिंगवी
दाळ मंडई, अहमदनगर.
फोन : 2344823/9422220723
आजच आपल्या जवळच्या दुकानदाराकडे मागणी करा!

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्षं जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – के.आचार्य गुंडेचा

email - navamaratha@gmail.com

माझ्या मराठीचिये कौतुके

आपल्या शहराच्या दृष्टीने नवराशीत २ गंगलदायी बातम्या आल्या. अहमदनगरचे नाव अहिल्यानगर करण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिली. तर जिल्ह्याचे सुपुत्र प्रा.डॉ. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अभ्यास ग्राह्य धरून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा बहाल केला. विशेष म्हणजे त्यासाठी प्राचीन ग्रंथ ज्ञानेश्वरी, लीळाचरित्र, गाथा सप्तशती या संदर्भांचा संबंधही आपल्या जिल्ह्याशी आहे.

खरं तर अभिजात ते अभिजातच असते. आपल्या मराठीच्या भाषा समृद्धीने केवळ बोलाचालींनाच नव्हे तर साहित्यालाही वैभवशाली केलंय. गत शतकातील काव्य, साहित्याचा ठेवा अनमोल आहे.

थोडसं वास्तविक विचार केला तर आजच्या सोकॉल्ड इंग्लाळलेल्या शालेय व कॉर्पोरेट वातावरणात मराठी भाषा दुर्लक्षित झाली आहे. मराठी शाळांची स्थिती अतिशय नाजूक आहे. म्हणूनच आज तरी शासन, प्रशासनापासून महाराष्ट्रात राहणाऱ्या सर्वच मराठीजनांनी मराठीतच बोलण्याचा, लिहिण्याचा विचार, प्रयत्न व संकल्प केला पाहिजे.

ज्ञानेश्वरांनी अमृताही पैजा जिंकणाऱ्या या भाषेला सुवर्णगेलेत दिले तर येत्या अनेक शतकातील सारस्वतांनी तिला वैभव प्रदान केले. शाळा, कॉलेजेसमधून दर्जेदार साहित्य, काव्य वाचले गेले पाहिजे. बोलीभाषेसह आज मराठी काहीशा मरणप्राय स्थितीत आली असेल तर, मराठीच्या महावृक्षाची पालेमुळे जर खुजी होत असतील तर त्या पाळामुळांना पाणी देणे हे मराठीच्या डोक्यावर नवा मुकुट घालण्यापेक्षाही महत्त्वाचे काम असेल.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन

"मुसाफिर"–९८२२०२०६९१

विश्वास जुना, आम्हीच पुन्हा.. नगर आयटी पार्कच्या नावाने लावला चुना

किती कंपन्या आणल्या? किती युवकांना रोजगार दिला? सत्ताधाऱ्यांना सवाल

आयटी पार्कच्या दुसऱ्या मजल्यावर धूळखाल पडत असलेला उद्घाटनाच्या फलकावरील धूळ साफ करताना किरण काळे. तर काळे यांची पाहणी सुरू असताना दुसऱ्या छायाचित्रात पोलिसांना पाचारण करण्यात आल्याचे दिसत आहे.

नगर – विद्यमान सत्ताधाऱ्यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून सन २०१९ च्या निवडणुकीपूर्वी शहरात आयटी पार्क उभारण्यात आला होता. या आयटी पार्कची दुसऱ्यांदा शहर काँग्रेस जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी सोशल मीडियाद्वारे लाईव्ह पोलखोल केली आहे. यावेळी त्यांनी ईन कॅमेरा दाखवले आहे की, तथाकथित आयटी पार्कची बहुतांशी बिल्डिंग रिकामीच आहे. गुटखा, माव्याच्या पुडयांचा खच बिल्डींगमध्ये आढळून आला. आयटी पार्कच्या उद्घाटनाचा फलक देखील धुळखात पडल्याचे आढळून आले. ज्यांना लोकांनी लोकप्रतिनिधी म्हणून निवडून दिले त्या सत्ताधाऱ्यांनी त्यांच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात एमआयडीसीत किती कंपन्या आणल्या? किती युवकांना रोजगार दिला? एमआयडीसी विस्तारीकरणासाठी काय केले? उद्योजकांचे कोणते प्रश्न सोडवले?, असे अनेक जाहीर सवाल काळे यांनी केले आहेत.

विश्वास जुना, आम्हीच पुन्हा अशी शहरभर पोस्टरबाजी करणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या कामांची काँग्रेसच्या वतीने सत्य आणि अहिंसेचा संदेश देणाऱ्या महात्मा गांधी जयंती निमित्त किरण काळे यांच्या नेतृत्वाखाली पोलखोल केली जात आहे. यावेळी ओबीसी शहर जिल्हाध्यक्ष संजय झिंजे, अल्पसंख्यांक शहर जिल्हाध्यक्ष अनिस चुडीवाला, माथाडी शहर जिल्हाध्यक्ष विलास उबाळे, युवक उपाध्यक्ष विकास भिंगारदिवे आदी उपस्थित होते. विश्वास जुना, आम्हीच पुन्हा.. आयटी पार्कच्या नावाने तरुणांना लावला चुना असे फलक यावेळी झळकवण्यात आले.

श्री. काळे यांनी या व्हिडिओत लाईव्ह दाखवलेले आहे की, आयटी पार्कच्या बिल्डिंगमध्ये ट्रेडिंग कंपनी, पतसंस्था, ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, जीएसटी कन्सल्टंट अशा काही व्यावसायिक आस्थापना आढळून आल्या आहेत. या आस्थापना म्हणजे काही आयटी पार्क नाहीत. या ठिकाणी मागील काही दिवसांमध्ये एक आयटी कंपनी आली आहे. मात्र ती आणण्यामध्ये शहराच्या लोकप्रतिनिधींच कोणतही योगदान नाही.

श्री. काळे म्हणाले, शहराच्या लोकप्रतिनिधी मागील निवडणुकी पूर्वी शहरातील तरुणांना रोजगाराचे दाखवत तीन हजार तरुणांच्या मुलाखती घेऊन नोकऱ्या देणार असे जाहीर केले होते. मात्र प्रत्यक्षात फार थोडया तरुणांना नोकऱ्या मिळाल्या. त्यांना त्या ठिकाणी सॉफ्टवेअरचे नव्हे तर डाटा एन्ट्रीचे काम दिले गेले. सत्ताधाऱ्यांनी आपल्या बगलबच्चांच्या नावाने कंपन्या स्थापन करून त्यांनाच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जा दिला. निवडणूक संपल्यानंतर लगेचच बगलबच्चांनी आपल्या कंपन्यांचा गाशा गुंडाळला. या ठिकाणी आयटी कंपनी सुरू असल्याचा दावा केला. काळे यांनी प्रश्नांची सरबत्ती केली असता या महिला प्रतिनिधीने या कंपनीत कामाला असणाऱ्या शंभर लोकांपैकी ठिकाणी नव्वद टक्के बीपीओ आणि दहा टक्के आयटीचे असल्याचे सांगितले. त्यावर काळे यांनी म्हटले की त्यातील यांनीच कबूल केली की इथे नव्वद टक्के लोक बीपीओत काम करतात. बीपीओ म्हणजे आयटी नाही. बीपीओ हे कॉल सेंटर आहे. यावेळी एका पुरुष प्रतिनिधींना आपल्या या कंपनीच्या सॉफ्टवेअर इंजिनियर्स आहेत काय? असे काळे यांनी विचारले असता त्याने एकही सॉफ्टवेअर इंजिनिअर नसल्याची कबुली दिल्याचे व्हिडिओत दिसत आहे. काळे यांनी सांगितले की या बिल्डिंगमध्ये असणारे लोकच सांगतात की या ठिकाणी आयटी पार्क चालत नाही. त्यामुळे तथाकथित स्वयंघोषित कार्यसम्राटांनी शहरातल्या हजारो तरुणांची, त्यांच्या पालकांची, नागरिकांची व मतदारांची आपण आयटी पार्क सुरू करून शहरात हजारोंचा रोजगार दिल्याचा कांगावा करून फसवणूक केल्याचा जाहीर आरोप केला आहे.

आमदार संग्राम जगताप यांना 'लाईव्ह चर्चेचे' आव्हान

किरण काळे यांनी तथाकथित आयटी पार्क बाबत आरोप करत या आयटी पार्कचे शिल्पकार आ.संग्राम जगताप यांना लाईव्ह चर्चेसाठी येण्याचे जाहीर आव्हान दिले आहे. त्यांनी म्हटले आहे की, येताना अभ्यास करून यावे. अभ्यास न करता कृपया येऊ नये. यापूर्वी देखील मी आमदारांना यावेषयी जाहीर चर्चा करण्यासाठी येण्याचे आव्हान दिले होते. मात्र ते मित्रे, भेकड आहेत. त्यांनी तरुणांना रोजगार देतो म्हणून त्यांच्या भावनांची चेष्टा केली आहे. म्हणूनच ते लाईव्ह चर्चेला येत नाहीत. ते पळपुटे आहेत, असा आरोप केला आहे.

दरम्यान, काळे यांचे आव्हान स्वीकारत जगताप चर्चेला येणार का याबाबत आता शहरात चर्चा सुरू झाली आहे.

अनेक मुलांचे वेतन देखील दिले गेले नाही. त्यांची फसवणूक केली गेली, असा आरोप किरण काळे यांनी केला.

आयटी पार्कमध्ये कॉल सेंटर

श्री. काळे यांची पाहणी सुरू असताना कोणी तरी पोलिसांना फोन करून पाचारण केले. त्यावेळी एमआयडीसीचे पोलीस उपनिरीक्षक कर्मचाऱ्यांसह त्याठिकणी दाखल झाले. यावेळी एका कंपनीच्या महिला चालकाने या ठिकाणी आयटी कंपनी सुरू असल्याचा दावा केला.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नगर जिल्ह्यातील मतदार संघ निहाय काँग्रेसच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यासाठी नगरमध्ये आलेल्या प्रदेश कार्याध्यक्ष मुजफ्फर हुसेन यांचे स्वागत करताना इच्छुक उमेदवार मंगल भुजबळ. समवेत जिल्हाध्यक्ष जयंत वाघ व महिला पदाधिकारी.

संगमनेर वगळता ११ मतदारसंघात काँग्रेसच्या इच्छुकांनी दिल्या मुलाखती

नगर शहरातून किरण काळे, मंगल भुजबळ आणि मोहसीन शेख यांचा समावेश

नगर – आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नगर जिल्ह्यातील १२ ही मतदार संघातील काँग्रेसच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती प्रदेश कार्याध्यक्ष मुजफ्फर हुसेन यांनी शिर्डी आणि नगर येथे घेतल्या आहेत. निरीक्षक मुजफ्फर हुसेन यांच्या निदेशानुसार काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ यांच्या समवेत अगोदर शिर्डी आणि नंतर नगर शहरात हे मुलाखतींचे सत्र पार पडले.

विधानसभेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने प्रदेश काँग्रेस कमिटीने राज्यातील इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवले होते ते अर्ज प्रदेश कार्यालयाकडे प्राप्त झाल्यानंतर नगर जिल्ह्यात इच्छुक उमेदवारांची विधानसभानिहाय यादी पाठवण्यात आली आणि या सर्व इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींचा कार्यक्रम घेण्यात आला. याबाबतचा गोपनीय अहवाल १० ऑक्टोबर पर्यंत प्रदेश कार्यालकडे सादर करण्यात येणार आहे. यावेळी झालेल्या मुलाखतीमध्ये अकोल्यासाठी सतीश भांगरे, शिर्डीसाठी पंकज लोंढे, एकनाथ गोंदकर, संभाजी चौगुले, प्रभाताई घोगरे, तर श्रीरामपूर मध्ये विद्यमान आमदार लहू कानडे, प्रदेश युवकचे हेमंत ओगले, विलासराव खाजेकर, अंड.प्रकाश संसार, डॉ.सौ.चेतना बनकर आणि युवराज बागुल यांनी मुलाखती दिल्या.

नेवाशात सचिन शेटे, संभाजी मालव्दे आणि दिलीप वाकचौरे यांनी इच्छुक म्हणून हुसेन यांच्याशी संवाद साधला. संगमनेर मध्ये माजी मंत्री बाळासाहेब थोरात हे असल्याने तेथे कोणत्याही उमेदवाराने निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केलेली नाही.

नगर शहरातून इच्छुक म्हणून किरण काळे, मंगल भुजबळ आणि मोहसीन शेख यांनी मुलाखती दिल्या. श्रीगोंदा विधानसभेसाठी घनश्याम शेलार यांचा एकमेव अर्ज होता. तर कर्जतमध्ये पुन्हा मंगल भुजबळ आणि अंड.कैलासराव शेवाळे यांनी निवडणूक लढवण्याची इच्छा बोलून दाखवली. यावेळी इच्छुक उमेदवारांनी शक्ती प्रदर्शन केले.

भिंगार छावणी परिषदेच्ही नामांतर अहिल्यानगर छावणी परिषद असे तातडीने करावे या मागणीचे निवेदन भिंगार भाजप व शिववेना महायुतीच्या वतीने महेश नामदे व सुनील लालबोंद्रे यांनी छावणी परिषदेचे मुख्याधिकारी विक्रांत मोरे यांना दिले.

घरात गळफास घेत तरुणाची आत्महत्या

नगर – एका ३३ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना बोल्हेगाव परिसरात असलेल्या पोलिस कॉलनीत रविवारी (दि.६) सकाळी घडली. प्रशांत रंगनाथ म्हस्के रा. पोलिस कॉलनी, बोल्हेगाव) असे मयताचे नाव आहे. म्हस्के यांनी घरात गळफास घेतल्याचे निदर्शनास आल्यावर त्यांना त्यांचे नातेवाईकांनी जिल्हा शासकीय रुग्णालयात रविवारी सकाळी ९ च्या सुमारास उपचारासाठी दाखल केले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ.विशाखा जिंदे यांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबतची खबर तोफखाना पोलिसांना देण्यात आली. त्यावरून पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास स.पो. जी.जी.गोर्डे हे करीत आहेत.

श्रीमती प्रभावती चोरडिया यांचे निधन

नगर – केडगाव येथील रहिवासी श्रीमती प्रभावती सुभाषचंद्र चोरडिया (वय ७०) यांचे ६ ऑक्टोबर रोजी निधन झाले.

चेतन चोरडिया, अमित चोरडिया, सौ. तृप्ती शेटीया, सौ. दिपाली कोठारी यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्यावर केडगावच्या अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. भूषणनगर येथील अमित मेडिकलचे संचालक अमित चोरडिया व चेतन चोरडिया यांच्या त्या मातोश्री होत.

लताबाई मोढवे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – बागरोजा हडको येथील लताबाई मोढवे (वय ७९) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्यामागे पाच मुली, दिर, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक शिक्षण संस्थेचे कार्यालयाने अधीक्षक सदाशिव मोढवे यांच्या पत्नी होत.

बबईबाई ताके यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – राहाता येथील बबईबाई रंगनाथ ताके (वय ९५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

चितळी येथील शेतकरी व नेवासा येथील मुळा एज्युकेशनचे ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक भाऊसाहेब ताके यांच्या मातोश्री, ऑडिटर रणजित ताके यांच्या आजी होत.

शामराव परदेशी यांचे अल्पश: आजाराने निधन

श्रीरामपूर – येथील बांधकाम व्यावसायिक शामराव बाबुराव परदेशी (वय ७०) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार भाऊ, दोन मुले, दोन मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

सेंट्रिग कारागिर विजय परदेशी व अजय परदेशी यांचे ते वडील होत.

शहर विधानसभेसाठी मनसैनिक सज्ज

नाशिकला राज ठाकरे यांच्यासमोर इच्छुकांच्या मुलाखती

नगर – नगर शहर विधानसभेसाठी मनसैनिक सज्ज झाले असून पक्षाने दिलेल्या उमेदवारावर आपले एकमत होईल आणि तो उमेदवार निवडून आणण्यासाठी सर्व मनसैनिक प्रयत्न करतील अशी ग्वाही नगर शहर विधानसभा मतदार संघासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना दिली.

नाशिक येथे उत्तर विभागातील विधानसभा मतदारसंघातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती पार पडल्या. त्यावेळी मनसैनिकांचे तेथे गेले होते. मनसेचे जिल्हाध्यक्ष सचिन डफळ यांच्या नेतृत्वाखाली नगर जिल्ह्यातील बारा बारा विधानसभा मतदारसंघातील इच्छुकांनी त्या ठिकाणी मुलाखती दिल्या. सर्वच मतदारसंघात इच्छुक उमेदवारांची संख्या मोठी होती.

कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेताना राज ठाकरे.

राज ठाकरे यांनी सर्व जिल्ह्याचा आढावा घेऊन सर्वांशी संवाद साधून मार्गदर्शन केलं. निवडणूक लढवण्यासाठी पक्षाची असलेली तयारी आणि रणनीती याविषयी सविस्तर चर्चा यांनी केली. पक्षाने अभ्यंकर, नार्वेकर, शिदोरे आणि अन्य पदाधिकाऱ्यांनी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेऊन पदाधिकाऱ्यांकडून मतदार संघाचा आढावा घेतला.

नगर शहरात सुमित वर्मा यांनी मनसे युवा सेना पक्षाने दिलेल्या उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभी असेल असे आश्वासन दिलेल्या.

इच्छुकांच्या यादीमध्ये इंजिनीयर नविन काकडे, सचिन डफळ आणि अँड. अनिता दिघे यांची नावे होती.

श्री. डफळ यांनी सर्व इच्छुक उमेदवार आणि मतदार संघातील परिस्थितिची माहिती वरिष्ठांना दिली. अंड. दिघे यांनी उमेदवारी देतानां महिलेला प्राधान्य आणि पक्षाशी निष्ठा याचा विचार करून मला उमेदवारी द्यावी अशी मागणी केली.

इंजि. काकडे यांनी शहरात दिवसेंदिवस बेरोजगारी वाढत असून गुन्हेगारी मध्ये वाढ होत आहे. गुन्हेगारी पोसण्यासाठी कही पुढारी सत्तेचा वापर करीत आहेत. एकंदर शहराची वाटचाल विकासा ऐवजी भकास शहराकडे सुरू आहे. यासारख्या अनेक कारणांमुळं जनता आणि व्यापारी त्रस्त असुन सक्षम पर्यायच शोधात आहेत.

नगरकरांनी परिवर्तन करण्याचे ठरविले आहे. माझ्यासारख्या सक्षम, निर्भिड, सामान्य, सुशिक्षित, मोठा जनसंपर्क आणि नियोजनाची दूरदृष्टी असलेल्या उमेदवारास नगरकर नक्ही संधी देतील. राज ठाकरे यांना आणि महाराष्ट्राच्या विकासाबद्दल त्यांच्याकडे असलेला दृष्टिकोन यावर शहरातील जनतेचा विश्वास आहे. आणि याच्या जोरावर आपण संपूर्ण महाराष्ट्राला हेवा वाटेल असं शहर घडविण्यासाठी प्रयत्नशील राहू याबद्दल ग्वाही दिली.

नगर जिल्ह्यात मनसेची ताकद चांगल्या प्रकारे आहे. राज साहेबांना म्हणणारे त्यांच्या विचारांना साथ देणारे मतदार देखील मोठ्या प्रमाणात आहेत. पक्षाने जर सक्षम उमेदवार दिला तर तो निश्चित्च निवडणुकीत आघाडीवर राहून शेवटच्या टप्प्यात जनमत एकवटू शकतो मतांचे विभागणीत आपल्या उमेदवाराची सरशी होऊ शकते असा निष्कर्ष यावेळी निघाला.

आयात उमेदवारापेक्षा आपल्या पक्षाची ध्येयधोरणे आणि विचार महीत असलेला कार्यकर्ता जर निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असला तर त्याला प्राधान्य देण्यात येईल असे राज ठाकरे यांनी यावेळी सांगितले. विधानसभा निवडणुकीसाठी कामाला लागा तयारी सुरू करा. उमेदवार कोणताही असो तो निवडून आणणे ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे.

नगर जिल्ह्यात दोन सभा राज ठाकरे यांच्या होतील त्यातील नगर शहरातील सभा ही तर निश्चित्च आहे. दुसऱ्या सभेची जागा निश्चित करून उत्तरेत ती दिली जाईल असे नियोजन यावेळी ठरले.

नगर शहरात इंजिनियर विनोद काकडे यांच्या नावाला सर्वांचाच पाठिंबा असून पक्षाने जर संधी दिली तर सचिन डफळ यांनी देखील निवडणूक लढवण्याची तयारी आपली सर्वांतोपरी असल्याचे त्यांनी सांगितले.

मनसे नगर शहरात लवकरच रॅपिड ॲक्शन फोर्स तयार करून मतदारांच्या व्यक्तिगत भेटीगाठी यावर भर देऊन प्रचार जोरात सुरू करणार असल्याचे श्री. डफळ यावेळी पदाधिकाऱ्यांना सांगितले.

शिवसेनेने व राष्ट्रवादीने नगर शहराचे लचके तोडले; मनसेच्या अस्तित्वासाठी यंदाची निवडणूक लढवावी

मनविसेचे सुमित वर्मा यांची मागणी

नगर – गेली २५ वर्षे शिवसेनेने तर १० वर्षे राष्ट्रवादीने नगर शहराचे लचके तोडले आहेत. अहिल्यानगर मतदार संघात २००९ सालची निवडणूक वगळता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने संपूर्ण ताकदीनिशी एकही निवडणूक लढविली नाही. त्यामुळे यंदाची निवडणूक जिल्ह्यात पक्षाच्या अस्तित्वाची असणार असल्याने तो संपूर्ण ताकदीनिशी लढायला हवी अशा मागणीचे निवेदन मनसेचे विद्यार्थी सेनेचे राज्य उपाध्यक्ष सुमित वर्मा यांनी मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांना पाठविलेल्या निवेदनात केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर मतदार संघात २००९ सालची निवडणूक वगळता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने संपूर्ण ताकदीनिशी एकही विधानसभा निवडणुक लढविली नाही या मुळे यंदाची निवडणूक ही जिल्ह्यातील आपल्या पक्षाच्या अस्तित्वाची प्रश्नासाठी असणार आहे म्हणून आम्हा सर्वांची विनंती आहे आपण ही निवडणूक संपूर्ण ताकदीनिशी लढायला हवी. शहरातील कोणत्याही महाराष्ट्र सैनिकाला उमेदवारी द्या आम्ही सर्व महाराष्ट्र सैनिक या लढ्यासाठी तन मन धनाने नक्हीच कामाला लागू पण कोणत्याही आयात उमेदवाराला उमेदवारी देऊ नका अशी आहे. आपण स्वतः आम्हा सर्व कार्यकर्त्यांच्या भावना जाणून आहात संघर्ष सर्व जण करत आहेत सर्वांच आपलं एक काम आहे. शहराचे राजकारण पाहता कोण कोणासाठी काय करेल याची अजिबात शाश्वती नही सर्व काही आलबेल असल्याने मनसे साठी सुपिक वातावरण आहे. शहरात सर्व रस्ते नांगरून ठेवल्या सारखे झाले आहे २५ वर्ष शिवसेनेने तर गेली १० वर्ष राष्ट्रवादी ने या शहराचे लचके तोडले आहेत. फसवणूक, सर्वसामान्यांच्या जागेवर ताबेमारी, गुंडागिरी, दहशतवाद इतका फोफावला आहे की सर्वसामान्य माणूस यावर काहीच बोलू शकत नही.

यंदाची निवडणूक लढावी या मागणीचे निवेदन राज ठाकरे यांना देताना मनसेचे विद्यार्थी सेनेचे राज्य उपाध्यक्ष सुमित वर्मा.

शहरात आयटी पार्क म्हणून कॉल सेंटर चालवून तरुणांना फसवलं जात आहे, शहराचा युवा वर्ग हजारोंच्या संख्येने बाहेरगावी नोकरीसाठी गेला आणि हे शहर फक्त पेंशनर्स लोकांचं शहर म्हणून ओळखले जाऊ लागले.

या शहराच्या नेतृत्वाकडून अवैध धंद्यांचं मोठं जाळं उभं केलं जात आहे यामध्ये मोठ्या प्रमाणात युवा वर्ग देशोधडीला लागला आहे शहरात वर्षभरात ६/७ युवकांचे खुन झाले या सर्व परिस्थितीला भक्कम पर्याय म्हणून मनसे नक्हीच असू शकतो. सध्या महिलांना भुलावण्यासाठी होम मिनिस्टरचे कार्यक्रम घेतले जात आहे आणी या कार्यक्रमा च्या नावाखाली महिलांना गंडवलं जात आहे म्हणजे खरा कार्यक्रमच करण्यायं नियोजन आहे.

सर्व गोष्टी फसव्या आहेत लोकांना आता सक्षम पर्याय हवा आहे आपल्या माध्यमातून हा पर्याय उभा होईलच या बद्दल साशंकता नाही. आपण वरील विषयावर विचार करून योग्य तो निर्णय घ्यावा आणि आमच्या खांद्यावर जी जबाबदारी देणार त्या संधीचे नक्हीच सोनं करून दाखवण्याचा आपल्याला शब्द देत आहे.

गृहिणी

आरोग्य

...तर धोकादायक ठरतील गॅझेटस्

स्मार्टवॉचसाठी जो बँड वापरला जातो तो प्लास्टिक पासून बनवलेला असतो. स्मार्टवॉचची वेळोवेळी स्वच्छता केली नाही, तर हेच विषाणू आपल्या शरीराचा ताबा घेतात. त्यातून अनेक आजारांना निमंत्रण मिळते. तज्ज्ञांच्या मते ही उपकरणे नियमित स्वच्छ ठेवणे हा यावर एकमेव उपाय आहे. मार्केटमध्ये अनेक प्रकारचे जंतुनाशक स्प्रे आहेत. त्याचा वापर करून ९९ टक्के विषाणू नष्ट करता येतात.

नवरात्रोत्सव उपवास स्पेशल पाककला

साबुदाण्याचे लाडू

साहित्य : साबूदाणा, पिठीसाखर, तूप, वेलची.

कृती : साबूदाणा चांगला भाजून घ्यावा. तो गरमच दळून, त्याचे पीठ करून ठेवावे. हे पीठ बरेच दिवस टिकते. दोन वाट्या पिठास एक वाटी पिठीसाखर घ्यावी.

तूप फेसून घ्यावे. त्यात पिठीसाखर घालावी व ते पुन्हा चांगले फेसून, त्यात साबूदाण्याचे पीठ व वेलचीची पूड घालावी व चांगले मळून लाडू वळावेत. ह्या लाडवांत खसखसही घालतात. त्यामुळे लाडू खमंग लागतात. खसखस भाजून घालावी.

वास्तू

देवघराचे स्थान

* तुमच्या घरातील देवघराचे स्थान ईशान्य व्यतिरिक्त अन्य कोणत्याही दिशेत असल्यास पितृदोष, कालसर्पदोष, काम काजात बाधा, अडचणी, अनाकलनीय आजार, अशांतता, वादविवाद अशा प्रकारचे अनेक अडथळे निर्माण होतात.

* जी वस्तू आपल्या शरीरास हानीकारक असते ती देवासाठी वापरू नये. त्या ऐवजी लिंबू-हळद मिश्रण वापरणे खूप चांगले.

सल्ला

जलद मोड यावयास पाहिजे असल्यास, धान्य उपसल्यावर त्यावर थोडे गरम पाणी घालावे व निथळल्यावर फडक्यात बांधावे. मसुरा व वाल यांना मोड येण्यास इतर धान्यांपेक्षा जास्त वेळ लागतो.

सौंदर्य

उन्हापासून, थंडीपासून केसांचे संरक्षण व्हावे म्हणून स्कार्फ बांधावा. केस नैसर्गिकरीत्याच सुकवावे. कायम ड्रायरचा वापर करू नये.

संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ८ ऑक्टोबर २०२४

---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आश्विन शुक्लपक्ष, ज्येष्ठा २८।०८, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.

राशिभविष्य

मेष : दिवस चांगला जाईल. महत्त्वाच्या कार्यात हितचिंतकांकडून मदत मिळेल.

वृषभ : जुने मित्र भेटतील. हितशत्रुंपासून डोके वर काढतील. वाहने सावकाश चालवावीत. नवीन करार होतील.

मिथुन : व्यावसायिक अडचणी सतावतील. पितृचिंता जाणवेल. नोकरपेशा व्यक्तींसाठी काळ चांगला आहे.

कर्क : कौटुंबिक विषयांमध्ये वेळ अनुकूल राहील. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. मानसन्मानात वाढ होईल.

सिंह : धार्मिक भावना वाढेल. सामाजिक कार्यामध्ये अनुकूल सहयोग मिळेल.

कन्या : राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषदायक राहील. भातृचिंता सतावेल.

तूळ : न्यायसंबंधी विषयांमध्ये यश मिळेल. महत्वपूर्ण कार्यांमध्ये यश मिळेल. आरोग्य उत्तम राहील.

वृश्चिक : दिवस आनंदात जाईल. मानसन्मानात वाढ होईल.

धनु : पूर्वीपासून आपल्या मनातील असलेले संकल्प पूर्ण होतील.

मकर : आपण आपल्या घरासाठी मोठी खरेदी करू शकता. कार्य योग्य वेळी पूर्ण होतील.

कुंभ : वाहने चोरीस जाण्याची शक्यत आहे. मानसन्मान मिळेल. थोरामोठ्यांकडून आशिर्वाद मिळतील.

मीन : मागील उधारी वसुल होईल. मानसन्मानात वाढ होईल.

संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

हसा आणि शतायुषी व्हा!

सभा चालू होऊन बराच वेळ झाला होता. श्रोत्यांच्या सहनशक्तीचाही अंत झाला होता. अशावेळेस एक वक्ता बोलायला उठला व म्हणाला.

'मला फक्त दहा मिनिटेच देण्यात आली आहेत. त्यामुळे कुठून सुरूवात करावी काही कळत नाही.

श्रोत्यामधून एक आवाज आला, ९ मिनिटे झाली आहेत असे समजून सुरवात करा.

...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* जर्मनीच्या देशांतर्गत विमान सेवा १९१९ मध्ये सुरू झाली. बर्लीन व हॅम्बर्ग विमानसेवा १ मार्चला व बर्लीन वारनेमुंड विमानसेवा १५ एप्रिल १९१९ ला दिली गेली.
* पहिली जेट विमान सेवा ही BOAC ने सुरू केली व जेट विमानाचे नाव होते डी हाविलँड कॉमेट.

– अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

शब्दगंध क्र. ७०२६ सौ.शैलजा कुलकर्णी

शब्दगंध क्र. ७०२५ चे उत्तर



आडवे शब्द :- १) मागणीचा लकडा ३) मुळीच नसणे ५) दिलेला शब्द मोडणे ७) तांडव्यावर वस्ती करून राहणारी एक जमात ९) तपास; शोध; ठावठिकाणा ११) क्षण; घटिकेचा साठावा भाग १२) अंथरूण; बिछाना १३) एक समसंख्या १४) चिंता; काळजी १५) कै, किल्येक १६) एक प्रकारचे गवत १७) महादेवाचे मंदिर १९) स्वाक्षरी; सिग्नेचर २०) स्वारी २१) एक महसूल अधिकारी (जुने नाव) २२) न बोलण्याचे व्रत

उभे शब्द :- १) गरम मसाल्यातील एक पदार्थ २) अनेक जनावरे ज्याला बांधतात ती लांबलचक एकच दोरी ३) संत तुकाराम महाराजांचे भक्तिकाव्य या नावाने ओळखले जाते ४) वाटा; हिस्सा ६) मुस्लिमांची प्रार्थना ८) माला; हार; डोंगराळ जमीन १०) रावणाच्या तोंडांची संख्या १२) धान्य मोजण्याचे एक जुने माप १३) सर्व; समस्त; सारा १४) घोटाळा; गडबड; एक पालेभाजी १५) बाजू घेणारा; वकील; पक्ष सावरून धरणारा १६) अभियान १७) गावच्या सीमेच्या आतील गावठाणाव्यतिरिक्त सारी जमीन १८) याग; यज्ञ; मख १९) पूर्ण भरतीची वेळ २०) नेहमी; हमेशा

* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : अॅड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : लोक निंदा करोत अगर प्रशंसा; धैर्यशाली पुरुष स्वतःच्या मार्गावरून विचलित होत नाही. **– इमर्सन.**

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

उगवताना किंवा मावळताना सूर्य रंगीत का दिसतो?

आपण जेव्हा सकाळी किंवा संध्याकाळी सूर्य बघतो त्या वेळी तो आपल्याला तांबूस सोनेरी दिसतो. पण जसजसा तो डोक्यावर येतो तसतसे त्याच्याकडे बघणेही अवघड होते, तसेच तो भगभगीत पांढरा दिसू लागतो. त्यामुळे त्याच्याकडे बघण्याचे आकर्षणही उरत नाही.

सूर्य जेव्हा आपल्या डोक्यावर असतो तेव्हा त्याचे किरण सरळ आपल्याकडे येतात. ते हवेत शिरताना त्यांचे विशेष वक्रीभवन होत नाही आणि वर्णपृथक्करणसुद्धा होत नाही.

संध्याकाळी पृथ्वीच्या फिरण्यामुळे जेव्हा सूर्य क्षितिजाजवळ गेल्यासारखा वाटतो; किंवा उगवताना सूर्य क्षितिजावरून वर आल्यासारखा वाटतो, तेव्हा आपल्याजवळ पोहोचायला सूर्यकिरणांना बरेच जास्त अंतर कापावे लागते. याशिवाय वाटेत हवेतले धूलीकण, वाफ, धुराचे कण यांच्यावर तिरक्या पडणाऱ्या सूर्यकिरणांचे वक्रीभवन होतेच, शिवाय त्यांचे वर्णपृथक्करणही होते. सूर्यप्रकाश हा सात रांगांच्या रंगांना मिळून बनलेला असतो, हे आपल्याला माहीत आहेच. ते रंग आपल्याला सारख्या प्रमाणात मात्र दिसत नाहीत. यामुळे सूर्य उगवताना किंवा मावळताना तांबूस सोनेरी दिसतो.

आत्मविस्मृती

एक मेंढपाळ आपल्या मेंढ्या घेऊन जंगलात चरण्यासाठी गेला. मेंढ्या जंगलात चरत होत्या. मेंढपाळ एका झाडाला टेकून बसला होता. दूरवर त्याला एक सिंहाचा छावा झाडाच्या सावलीखाली बसलेला दिसला. मेंढपाळ हळूहळू झाडाजवळ गेला व त्याने अलगद छाव्याला उचलले. आजूबाजूला त्याला कुठेच सिंहीण दिसली नाही. त्याने तो छावा घरी नेण्याचे ठरविले. तो छावा घेऊन मेंढपाळ मेंढ्या घेऊन गावाकडे निघाला.

हा सिंहाचा छावा पुढे पुढे मेंढ्यांसोबतच रानात चरायला जाऊ लागला. मेंढ्या जे चारा खायच्या तोच छावा खाऊ लागला. एक दिवस मेंढ्या चरत असताना एका सिंहाने त्यांच्यावर झडप घातली. एक दोन मेंढ्या पकडून सिंह रानात निघून गेला. सिंहाने पकडलेल्या मेंढ्यामध्ये एक सिंहाचा छावादेखील असल्याचे लक्षात आले. त्याने मेंढ्या वाटेतच सोडून दिल्या व छाव्याला घेऊन तो एका तलावाकाठी गेला. तलावात छाव्याला त्याचे प्रतिबिंब पाहायला सांगितले, 'तू सिंह आहेस, सिंहासारखी गर्जना कर. मेंढ्यासारखा बे बे काय करतोस!'

असा उपदेश सिंहाने त्या छाव्याला केला. छाव्याने आपले प्रतिबिंब पाण्यात पाहिल्यावर आपण आपल्याला पकडलेल्या सिंहासारखेच आहोत याची जाणीव झाली. त्याने सिंहासारखी गर्जना करून पाहिली. पहिल्यांदा त्याला ते जमले नाही. परंतु नंतर तो गर्जना करू लागला. आपण शिकारी आहोत, शिकार नाही याची ओळख त्याला झाली.

तात्पर्य : आपल्यातील शक्ती विसरून माणसे समाजात वावरत असतात. ही आत्मविस्मृती झटकून समाजात उभे राहिले पाहिजे.

जीवन चक्र - मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)

जीवन की रोशनी

है जिसे हम गलती से मौत कह देते हैं और समझते हैं कि इसके साथ आदमी समाप्त हो गया।

प्रकृति में मौत जीवन के भोजन का काम करती है और जिन्दगी मौत को प्रकाशमयी करती है। सृष्टि का नियम सभी जगह और सारे मण्डलों में काम करता है। महापुरुषों ने खोज की है कि सबाई का ज्ञान निजत्व के (शारीरिक निजत्व जिसमें आत्मा कैद होती है) विनाश से होता है। जिस क्षण आत्मा अपनी मर्जी से इन जंजीरों में से बाहर निकल आती है, इस संसार के पीछे छिपे हुए रूहानी संसार का चकाचौंध कर देने वाला प्रकाश इस पर पड़ने से इसे जगमगा देता है और को परमात्मा का पैगम्बर बना देता है। इस बदलाव रूपी पहाड़ी पर चढ़कर मनुष्य धरती और स्वर्ग को मिले हुए देखता है और प्रभु के भेद खुलते जाते हैं। यहीं वह अन्धेरे को नूर में बदला हुआ और सुन्न को फलदायक हुआ पाता है।

समय के साथ-साथ किसी न किसी दिन मनुष्य, पशु, पक्षी, अमीर- गरीब, तन्दरुस्त बीमार, जवान बूढ़े सभी को मरना है। आत्मा जो मानवीय तन धारण करती है, उसको उसे किसी न किसी दिन छोड़ना होता है। इस संसार में जीना झूठ और मरना सच है। हमने कभी कम ही सोचा है कि शरीर के अन्दर आत्मा ने लम्बी यात्रा पर चलना है। हम प्रायः दूसरों की मृत्यु पर रुदन करते हैं और कई- कई दिन शोक मनाते हैं परन्तु इतने समझदार नहीं कि अपनी मौत की चिन्ता करके जीवन के अन्त में आने वाले लम्बे और अनजाने सफर की तैयारी कर लें। मौत की प्रक्रिया बड़ा अमली और जानकारी भरपूर अनुभव इसके बारे में जानने से पहले अच्छा होगा कि हम कम से कम यह जान लें, हम क्या हैं? कौन हैं? कहाँ से आये हैं? कहाँ जाना है? और इस सब के अतिरिक्त हमारे जीवन का उद्देश्य क्या है?

मनुष्य इस समय शरीर, मन और बुद्धि का समूह है जिसके पीछे एक महान शक्ति काम कर रही है जो इसे चलाने वाली है, जिसे आत्मा कहते हैं। हम (आत्माएँ) जन्म जन्मों से इस तरह के शरीरों में पड़े हुए हैं तथा हमारी आत्मा मन और इन्द्रियों द्वारा नीचे बाहर की ओर खिंची जा रही है। अपनी इच्छा से नहीं बल्कि ऐसा करने का हमारा स्वभाव सा बन चुका है। हम अभी अपने शरीर रूपी निवास स्थान के स्वामी नहीं बने। मन और इन्द्रियाँ निरन्तर हमें खींचकर भोगों रसों के विशाल खेतों के ओर ले जा रही हैं। हमारी आत्मा निरन्तर मन और माया के साथ लगी रहने के कारण हमें इतना गिरा और बिगाड़ दिया है कि हम अपने आप को पहचान नहीं रहे और भूल ही गये हैं कि हम कौन हैं? इन सीमित चीजों के साथ लग कर हम इतने सीमित हो गये हैं कि इनके अतिरिक्त अलग और कुछ भी नहीं जानते। जब तक आत्मा अपने इस मलमूत्र के तन को त्याग कर इसे सीमित करने वाले बन्धनों - चित्त, मन, बुद्धि, अहंकार; कोष अन्नमयी, प्राणमयी, मनोमयी, विज्ञानमयी और आनन्दमयी; तीनों गुणों सतो, रजो,

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहमदनगर)

शुद्ध जीवन जीने के मंत्र

भाग-३ : भविष्य की ओर एक साथ बढ़ना

आवश्यक सामग्री- १. सीडी प्लेयर तथा ध्यान लगाने में सहायक संगीत का चुनाव। २. सोल रिफ्रेश फॉर्म्स की प्रतिलिपियाँ तैयार करना। ३. सद्गुण कार्ड। ४. कला सामग्री बड़े चित्रफलक कागज, मोमी रंग, रंगीन पेंसिलें तथा पेन, मास्किंग टेप का रोल, रंग-बिरंगे कागज, कटआउट आदि के लिए पुरानी पत्रिकाएँ आदि।५. भाग लेनेवाले प्रत्येक परिवार से आग्रह करें कि वे अपने साथ कोई एक भोज्य सामग्री लाएँ, जिसे कार्यशाला समाप्त होने के बाद सभी मिलकर खा सकें।

३.१ एक साथ काम करना व रहना। (७५ मिनट) करना।

३.१.१ प्रारंभिक कथन परिवार सह-सामंजस्य निर्माण सत्र के तीसरे भाग में भागीदारों का स्वागत

३.१.२ हमारे परिवार के लिए एक परिकल्पना रचना ।

ध्यानपरक संगीत लगाएँ और सभी लोगों से मौन धारण करने को कहें- अब जब हम यहाँ मौन भाव से बैठे हैं, हम एक ऐसे आदर्श परिवार का चित्रण करते हैं, जहाँ प्रेम, सम्मान, सामंजस्य, सहयोग तथा आपसी

लगाव का भाव पाया जाता है। (विश्राम दें)

अपने आप से प्रेम करना

मैं इस आदर्श परिवार के घर में क्या देखता हूँ और क्या स्पर्श करता हूँ? (विश्राम दें) परिवार के सदस्य एक-दूसरे से कैसे मिलते हैं तथा संवाद स्थापित करते हैं? (विश्राम दें) अपने परिवार का एक आदर्श परिवार के रूप में मानसिक चित्रण करें। ऐसे आदर्श परिवार का हिस्सा बनकर कैसा अनुभव होगा? (विश्राम दें) अपनी बातचीत को सुनें। सदस्यों के बीच किन भावनाओं या शब्दों का आदान-प्रदान हो रहा है। (विश्राम दें) अपने आदर्श परिवार में एक पारंपरिक सप्ताहांत का मानसिक चित्रण करें। ३.१.३ गुणों व योग्यताओं को आपस में बाँटें । भागीदारों से कहें कि वे अपने परिवारों के साथ बैठें और इस अभ्यास में उन योग्यताओं व गुणों को बाँटें, जिनका उन्होंने मानसिक चित्रण किया। जब सभी सदस्य अपने अनुभव सुना दें तो आपसी सहमति से एक आदर्श परिवार की परिकल्पना तैयार करें। स्केच, संगीत व नृत्य या किसी आदर्श परिवार के चित्र के साथ अपने आदर्श परिवार की प्रस्तुति की योजना तैयार करें। इसके लिए यथासंभव सामग्री प्रदान की जाए।

३.१.६ भाग लेनेवाले परिवारों की परिकल्पना की प्रस्तुति ।

परिवारों से कहें कि वे आगे आकर सबके द्वारा प्रस्तुत की गई परिकल्पनाओं व दर्शन को देखें। जब वे उन रचनात्मक प्रस्तुतीकरणों को देखें तो उन्हें विभिन्न प्रस्तुतियों में समरूपता तथा विरूपता को भी पहचानना चाहिए।

३.१.७ इन परिकल्पनाओं के सामान्य तथा अद्भुत पक्षों को जानें।

सारे दल को निम्नलिखित जानने में सहायक हों- परिवार की परिकल्पनाओं के सामान्य व अद्भुत पक्ष सभी परिवारों के लिए सामान्य मूल्य तथा परिवार के लिए अद्भुत व अनूठे मूल्य । ३.२ अपनी परिकल्पना को यथार्थ रूप प्रदान करना (१५ मिनट) सभी भागीदारों से कहें कि वे अपने परिवार के समूहों में वापस जाएँ। परिवारों को अगली गतिविधि पूरी करने का मार्गदर्शन दें-

३.२.१ पारिवारिक सामंजस्य के गुण

हर परिवार को सद्गुण कार्ड की एक गड्डी दी जाएगी। एक परिवार के रूप में वे एक सप्ताह के लिए सद्गुण चुनेंगे। वे एक सप्ताह के लिए उसे अभ्यास' लाएँगे, ताकि अपने विजन या परिकल्पना को वास्तविकता में बदल सकें। पत्ते फेंटने के बाद मेज पर रख दिए जाएँगे।

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

चाळिशीची पहिली खूण जाणवते ती म्हणजे नेहमी वाचता. येणारे वर्तमानपत्र वाचताना डोळे दुखायला लागतात. अक्षरे अंधूक दिसायला लागतात. तसेच आरशासमोर उभे राहिल्यानंतर केसांमध्ये काही बटा पांढऱ्या झालेल्या दिसतात. 'माझे तारुण्य कधी निघून गेले हे मला कामाच्या व्यापांमध्ये लक्षातच आले नाही. मला तारुण्यात जे जीवन जगायचे होते ते राहूनच गेले' असे प्रत्येकीला वाटते. चाळिशी म्हणजे वृद्धत्वाची चाहूल होय. वृद्धत्व समोर दिसत असले, तरी प्रत्यक्षात ते येण्यास पंधरा-वीस वर्ष अवकाश असते. परंतु तो काळ सुरळीत पार पडण्यासाठी आत्तापासूनच शरीराची काळजी घ्यावी लागते. सुंदर दिसावे असे प्रत्येकीला वाटते. मात्र चेहरा आणि शरीर तजेलदार व सुंदर दिसण्यासाठी फक्त सौंदर्य प्रसाधनांचा वापर करून उपयोग नाही. चिरतारुण्य टिकवण्यासाठी व त्वचा सतेज राहण्यासाठी जीवनशैलीत योग्य बदल आणि योग्य आहार महत्त्वाचा आहे. आत्तापर्यंत मसालेदार, तेलकट, पदार्थ खाल्ले तरी जमत होते. रात्रीच्या जागरणाने त्रास होत नव्हता. परंतु इथून पुढे अनियमित जीवनशैली व आहार जमणार नाही,

चाळिशीनंतरही टिकवा तारुण्य

हे लक्षात घ्यायला हवे..

खालील उपाय व पथ्य रोजच्या जीवनात आचरणात आणले तर चांगले आरोग्य टिकून राहील.

१) संतुलित आहार घ्यावा - चमचमीत, चटकदार, मसालेदार, तेलकट, मटन, अंडी तसेच फास्ट फूड खाणे टाळावे आणि नैसर्गिक समतोल आहार घ्यावा. कारण चुकीच्या आहारामुळे वजन वाढते व त्यातूनच रक्तदाब, हृदयरोग असे आजार होतात. गाजर, काकडी, टोमॅटो, कोबी व कांद्याची पात हे पदार्थ सॅलड स्वरूपात सुरुवातीलाच कच्चे खावेत. पोळी खाण्याऐवजी तेल न लावलेला फुलका खावा. पालेभाज्या, फळभाज्या, मोड आलेली कडधान्ये खावीत. रोज नियमित नाश्ता करावा. कारण, नाश्ता केल्याने दिवसभराच्या कामासाठी ऊर्जा मिळते. नाश्त्यामध्ये फळ, दूध तसेच मोड आलेली कडधान्ये यांच्यापासून बनवलेल्या पदार्थांचा समावेश करावा. दुपारचे जेवण भरपूर करावे. परंतु रात्रीचे जेवण हलके व लवकर करावे. जेवण व झोप यांमध्ये तीन तासांचे अंतर ठेवावे. म्हणजेच साधारणतः संध्याकाळी ७ ते ८ या वेळेत जेवण करावे.

व्हिटॅमिनयुक्त आहार : शरीरामध्ये झालेली झीज भरून काढण्यासाठी व्हिटॅमिन्सयुक्त आहार हवा. कारण त्यातील 'ॲन्टिऑक्सिडंट्स' शरीराची झीज भरून काढतात.

व्हिटॅमिन ए : ए व्हिटॅमिन संतुलित राहण्यासाठी गाजर, लाल भोपळा, टोमॅटो, बीट, आंबा यांमधील एखादा पदार्थ रोज खायला हवा. व्हिटॅमिन ए चे औषध घेण्याची गरज नसते. त्यासाठी वरील पदार्थ खावेत.

व्हिटॅमिन बी : शरीराच्या संपूर्ण आरोग्यासाठी हे महत्त्वाचे असते. त्यासाठी पालक, मेथी, शेपू, हिरवी कांद्याची पात, तांदूळजा, राजगिरा, मोठ, चाकवत या भाज्यांचे सेवन आठवड्यातून तीनदा करावे.

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

आयएमएस संस्थेचे प्रा. विजय शिंदे यांना भारत भूषण पुरस्काराने सन्मानित करताना चित्रकुट स्कूलचे प्रमुख अशोक सचदेव, संस्थेचे इतर पदाधिकारी.

भारतभूषण पुरस्काराने आयएमएसचे प्रा. विजय शिंदे सन्मानित

नगर – शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात दिलेल्या योगदानासाठी आयएमएसचे प्रा. विजय शिंदे यांना भारत भूषण पुरस्काराने चित्रकुट इंटर नॅशनल स्कूलचे प्रमुख अशोक सचदेव यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

यावेळी संजय चव्हाण, अनुराधा राणा, पूजा गुरुस्था उपस्थित होते. केंद्र शासनाच्या मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स, इस्रो, नीती आयोग व चित्रकुट इंटरनॅशनल स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार सोहळा संभाजीनगर रोड वरील अक्षय पॅलेस याठिकाणी आयोजित करण्यात आला होता.

यावेळी शिक्षकांसाठी विविध विषयांवरील चर्चासत्रे आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना समजून घेताना त्यांचा भावनिक बुध्यांक, बौद्धिक बुध्यांक, व सामाजिक बुध्यांक यांचा योग्य समन्वय असणे किती गरजेचे आहे यावर विस्तृत चर्चा झाली.

प्रा. शिंदे हे गेले २५ वर्ष आयएमएस सारख्या व्यवस्थापन संस्थेत काम करत असून त्याद्वारे वृक्षारोपण, उद्योगांना भेटी, सामाजिक जनजागृती, वाहतूक नियमनाचे उपक्रम, पारणाय येथील डॉ. शरद कोलते इंग्लिश मिडीयम स्कूलच्या माध्यमातून ग्रामीण विकासात योगदान असे बहुविध काम करत असल्यामुळेच त्यांची या पुरस्कारासाठी निवड झाली.

पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे संचालक डॉ. एम बी मेहता, उपसंचालक डॉ. विजय बार्नबस, विभाग प्रमुख डॉ. प्रोनोती तेलोरे, ग्रंथालय प्रमुख डॉ. स्वाती बार्नबस, नियुक्त सरसंचालक डॉ. शरद कोलते, नियुक्त महसूल अधिकारी शिवाजी टेमकर यांनी अभिनंदन केले आहे.

या पुरस्काराचे श्रेय आयएमएस संस्था तसेच कुटुंबीय वैशाली शिंदे व मुली वेदिका आणि विधी शिंदे यांचे देखील आहे असे मत प्रा. शिंदे यांनी व्यक्त केले.

वधू वर मेळाव्याच्या माध्यमातून समाजाचे प्रश्न सुटतील

माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांचे प्रतिपादन; माळी वधू वर कार्यालयासाठी जागा उपलब्ध

नगर – समाजाची गरज ओळखून सकल माळी समाज ट्रस्टने तीन महिन्यापूर्वी वधुवर सूचक नोंदणी कार्यालय सुरु केले आहे. या वधू–वर नोंदणी कार्यालयास माळी समाजाचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. वधूवर सुचक मंडळाचे सर्व सदस्य निस्वार्थपणे समाज सेवा करीत आहेत.या कार्याची सकल माळी समाजाने जिल्हाभर व्याप्ती वाढवावी. तसेच मोठ्या प्रमाणात वधू वर मेळावे भरविण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करू. वधू–वर मेळाव्याच्या माध्यमातून समाजाचे प्रश्न सुटतील असे प्रतिपादन माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी केले आहे.

माळीवाडा येथील पेमराज गुगळे शाळेत खोली क्रमांक एक मध्ये सकल माळी समाज तर्फे संचलित माळी वधू वर कार्यालयाचे उद्घाटन माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांच्या हस्ते करण्यात आले.

माळीवाडा येथील पेमराज गुगळे शाळेत खोली क्रमांक एक मध्ये सकल माळी समाज ट्रस्ट संचलित माळी वधू–वर नोंदणी कार्यालयाचे उद्घाटन बाळासाहेब बोराटे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. यापरांगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सकल माळी समाज ट्रस्टचे अध्यक्ष किशोर डागवाले होते. तर प्रमुख उपस्थितीत ट्रस्टचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, जि.प.सदस्य शरद झोडगे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, प्रा.माणिक विधाते, डॉ.रणजीत सत्रे, अर्जुनराव बोरुडे, दत्ता पाथरे, अनिल इवळे, विनोद पुंड, अमोल भांबरकर, सुरेश आंबेकर, गजानन सस्साणे, कैंप्टन सुधीर पुंड, मच्छिंद्र बनकर, अॅड. राहुल रासकर, चंद्रकांत पुंड, डॉ.दामोदर कळमकर, ज्ञानेश्वर रासकर, भाऊसाहेब कोल्हे, रामदास फुले, फोटोग्राफर राजू खरपुडे, वधू–वर सुचक मंडळाचे अध्यक्ष अशोक हिंगे, उपाध्यक्ष भास्कर चौधरी, सचिव प्रा.अनुरीता झगडे, संजय कानडे, सुधाकर कानडे, विजय चौधरी, नंदकुमार नेमाने, संतोष हजारे, बाळासाहेब पटवेकर, बाबासाहेब दळवी, डॉ.भानुदास चौरे, रामचंद्र गिरमे पाटील, राजेंद्र झोडगे, संजय झोडगे,संदीप पानमळकर, विलास सदाफुले, ज्ञानेश्वर धाडगे, ज्ञानेश्वर शिंदे, गणेश शिंदे, सुरेखा गिरमे, चंद्रकांत हजारे आदी उपस्थित होते.

किशोर डागवाले म्हणाले, समाजाची गरज ओळखून माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी माळी वधूवर कार्यालयास विनामूल्य कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे समाजाला माळी वधू वर नोंदणी कार्यालयासाठी हक्काची जागा मिळाली आहे. तसेच माळी वधू वर कार्यालयाच्या कामास गती मिळेल व प्राधान्याने समाजाचे प्रश्न सुटतील.

शरद झोडगे म्हणाले, माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांच्या सहकार्याने सकल माळी समाजाच्या वधू वर कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून दिली.माळी वधू वर कार्यालयाच्या माध्यमातून समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी सकल माळी समाजाने नेहमीच उत्तम कार्य केले आहे.

कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी लवेश गोंधळे,रमेश चिपाडे,रोहित पठारे, संजय ताजणे, सुदाम बोरुडे, निळकंठ विधाते, भानुदास बनकर आदींनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.अनुरीता झगडे यांनी केले तर आभार अशोक हिंगे यांनी मानले.

मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये नवरात्रोत्सवानिमित्त ती चा जागर कार्यक्रमप्रसंगी प्राचार्या अनुरीता झगडे. समवेत विद्यार्थी–विद्यार्थिनी, शाळेतील शिक्षक, शिक्षिका.

देशातील कर्तृत्ववान महिलांचा आदर्श विचार समाजापुढे यावा

प्रा. अनुरीता झगडे यांचे प्रतिपादन; मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये ती चा जागर

नगर – भारत देशाच्या प्रगतीत कर्तृत्ववान महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात राहिला आहे. नवरात्र उत्सवानिमित्त शाळेतील सर्व महिला शिक्षकांनी ती चा जागर या कार्यक्रमाच्या माध्यमातून इतिहासातील पराक्रमी, कर्तृत्ववान महिलांचा पोशाख परिधान करून शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची माहिती करून दिली. देशातील कर्तृत्ववान महिलांचा आदर्श समाजापुढे यावा या उद्देशाने ती चा जागर हा कार्यक्रम घेण्यात आला आहे.असे प्रतिपादन मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या प्रा. अनुरीता झगडे यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये नवरात्र उत्सवानिमित्त ती चा जागरमोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. राजमाता जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई, डॉ. आनंदी जोशी, सावित्रीबाई फुले, कल्पना चावला, लता मंगेशकर, सिंधुताई सपकाळ, मिस वर्ल्ड सुष्मिता सेन, माधुरी दीक्षित या रणरागिनींच्या वेशभूषा शाळेतील महिला शिक्षकांनी केल्या होत्या. या कार्यक्रमासाठी हिंदसेवा मंडळाचे सर्व पदाधिकारी, शाळेचे चेअरमन जगदीश झालानी यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमात शिक्षिका विनिता पटवेकर, आशा घोरपडे, रुपाली कुलकर्णी, गायत्री भंडारे, शितल दळवी, सत्यश्री चिलका, आयमन बागवान, मोनिका बमदाळे, मोहिनी नराल, रेणुका पठारे या सर्व शिक्षिका सहभागी झाल्या होत्या.

रोटरी क्लब मिडटाऊन व क्रिस्टल ग्रुपच्या 'दिवाळी एक्सपो' प्रदर्शनास प्रतिसाद

नगर – रोटरी क्लब अहमदनगर मिडटाऊन व क्रिस्टल ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी एक्सपो या बहुपयोगी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाला नागरकांनी प्रतिसाद दिला. प्रदर्शनाचे उद्घाटन रोटरी क्लब मिडटाऊनचे अध्यक्ष अजय पिसुट्टे यांच्या हस्ते झाले. यावेळी क्लबच्या सचिव मार्लिन एलिशा, क्रिस्टल ग्रुपच्या नेहा मंचानी, श्रद्धा लुणे, पूजा मुनोत व सोनल मालू आदींसह रोटरीयन्स नागरिक उपस्थित होते. रोटरीचे प्रांतपाल सुरेश साबू यांनी या प्रदर्शनाला भेट देवून उपक्रमाचे कौतुक केले.

रोटरी क्लब अहमदनगर मिडटाऊन व क्रिस्टल ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिवाळी एक्सपो या बहुपयोगी प्रदर्शनाचे उद्घाटन करताना रोटरी क्लब मिडटाऊनचे अध्यक्ष अजय पिसुट्टे.

यावेळी अजय पिसुटे म्हणाले, सध्याच्या काळात यशस्वी व्यावसायिक होण्यासाठी ग्राहकाभिमुख सेवा देणे आवश्यक आहे. नगर शहरात अशा चांगल्या सेवा देणारे अनेक छोटे व्यावसायिक आहेत. त्यांना भरपूर ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी रोटरी क्लब मिडटाऊन व क्रिस्टल ग्रुपच्या वतीने दिवाळी एक्सपो या बहुपयोगी प्रदर्शनाचे आयोजन केले. या प्रदर्शनात नागरिकांना सर्वप्रकारच्या दर्जेदार कंपन्यांच्या वस्तू एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने या प्रदर्शनाला नागरिकांनी प्रतिसाद दिला आहे. अशा प्रदर्शनाचे आयोजा रोटरी क्लब मिडटाऊन दरवर्षी करणार आहे.

प्रास्ताविकात नेहा मंचानी म्हणाल्या, दिवाळी एक्सपो प्रदर्शनामध्ये एकाच ठिकाणी नागरकांना सर्व प्रकारच्या दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या खरेदी बरोबरच फंशनेबल कपडे, दिवाळी डेकोरेशनच्या वस्तू, भेटवस्तू, गृह सजावटीच्या वस्तू, कलात्मक वस्तू आदी उपलब्ध झाले. तसेच येथे भेट देणाऱ्या नागरिकांची तज्ञ डॉक्टरांमार्फत मोफत आरोग्य तपासणीही करण्यात आली. यामध्ये मोफत कॅन्सर तपासणी, दंतरोग तपासणी व रक्तशर्करा तपासणी आदी मोफत करण्यात आले. तसेच अनेक खाद्यपदार्थांचा आस्वाद नागरिकांनी घेत रेडिओ माय एफएम चॅनेलच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध मनोरंजनात्मक खेळांचा आनंदही घेतला.

सूत्रसंचालन प्रियांका पिसुटे यांनी केले. क्लबच्या सचिव मार्लिन एलिशा यांनी आभार मानले.

जाहीर निविदांतर्गत खुली निविदा सूचना

ग्रामपंचायत गदेवाडी, ता. शेवगाव जि. अहमदनगर यांचे कडून जिल्हा परिषद नोंदणीकृत कंत्राटदार यांच्या मार्फत दोन लिफाफा पद्धतीने खालील कामाच्या निविदा मागवत आहे.

अ. नं.	कामाचे नाव	योजना	निविदा रक्कम	निविदा संचाची रक्कम	बयाना रक्कम	कामाची मुदत	अधिकृत ठेकेदार वर्ग
१	स्मशानभूमी येथे वाल कंपाउंड करणे. सिमेंट ब्लॉक बसवणे. बंदिस्त गेट बसवणे.	१५ वित्त आयोग २०२४–२५	२,५४,२८२	२३६	१%	६ महिने	सु. बे

(१) निविदा अटी व शर्ती इ.बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केलेला असून कोऱ्या निविदा संच दि. ०७/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून दि. १४/१०/२०२४ सायं. १७.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) निविदा दर टाकून सिलबंद लिफाफ्यामध्ये ग्रामपंचायत कार्यालयात सादर करता येतील. (२) निविदा संदर्भात सविस्तर माहिती अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. तसेच ब–१ निविदा संच फॉर्म ग्रा.पं. मध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे. (३) निविदा १५/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० ग्रा.पं. गदेवाडी येथे उघडण्यात येतील. (४) निविदा अटी व शर्ती मध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क ग्रा. पं. ने राखून ठेवला आहे. (५) निविदेसोबत आवश्यक ती सर्व कागदपत्र जोडावे.

सही
ग्रा. पं. अधिकारी ग्रा. पं. गदेवाडी
ता. शेवगाव जि. अहमदनगर

सही
सरपंच ग्रा. पं. गदेवाडी
ता. शेवगाव जि. अहमदनगर

जाहीर निविदांतर्गत खुली निविदा सूचना

ग्रामपंचायत मोहोज बु. ता. पाथर्डी जि.अहमदनगर यांचे कडून जिल्हा परिषद नोंदणीकृत कंत्राटदार यांच्या मार्फत दोन लिफाफा पद्धतीने खालील कामाच्या निविदा मागवत आहे.

अ. नं.	कामाचे नाव	योजना	निविदा रक्कम	निविदा संचाची रक्कम	बयाना रक्कम	कामाची मुदत	अधिकृत ठेकेदार वर्ग
१	गावअंतर्गत सुशोभीकरण करणे.	१५ वित्त आयोग २०२१–२२	१,३८,७८४	२३६	१%	६ महिने	खुला
२	मागासवर्गीय वस्ती मध्ये रस्ता करणे.	१५ वित्त आयोग २०२२–२३	१,४४,७९८	२३६	१%	६ महिने	खुला
३	गावअंतर्गत सुशोभीकरण करणे.	१५ वित्त आयोग २०२२–२३	२,२०,०००	२३६	१%	६ महिने	खुला

(१) निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केलेला असून कोऱ्या निविदा संच दि. ०७/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजे पासून दि. १४/१०/२०२४ सायं १७.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) निविदा दर टाकून सिलबंद लिफाफ्या मध्ये ग्रामपंचायत कार्यालयात सादर करता येतील. (२)निविदा संदर्भात सविस्तर माहिती अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. तसेच ब–१ निविदा संच फॉर्म ग्रा. प. मध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे. (३) निविदा १५/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० ग्रा. प. मोहोज बु येथे उघडण्यात येतील. (४) निविदा अटी व शर्ती मध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क ग्रा. प. ने राखून ठेवला आहे. (५) निविदे सोबत आवश्यक ती सर्व कागद पत्र जोडावे.

सही
ग्रा. पं. अधिकारी ग्रा. मोहोज बु
ता.पाथर्डी जि.अहमदनगर

सही
सरपंच ग्रा. पं. मोहोज बु
ता.पाथर्डी जि.अहमदनगर

जाहीर निविदांतर्गत खुली निविदा सूचना

ग्रामपंचायत हुच.ग्रा.प.कौठाळा. ता. पाथर्डी जि.अहमदनगर यांचे कडून जिल्हा परिषद नोंदणीकृत कंत्राटदार यांच्या मार्फत दोन लिफाफा पद्धतीने खालील कामाच्या निविदा मागवत आहे.

अ. नं.	कामाचे नाव	योजना	निविदा रक्कम	निविदा संचाची रक्कम	बयाना रक्कम	कामाची मुदत	अधिकृत ठेकेदार वर्ग
१	कौठाळा येथे मागासवर्गीय वस्ती जि.प.शाळा ते दशरथ कोकणी रस्ता क्रिमिट कॉटिंग करणे.	१५ वित्त आयोग	३८,१३४	२३६	१%	६ महिने	सु. बे
२	कौठाळा येथे अंबाजा नाळ रस्ता दुरुस्तीकरण करणे.	१५ वित्त आयोग	३४,१०१	२३६	१%	६ महिने	सु. बे
३	कौठाळा येथे बंदिस्त गटार करणे.	१५ वित्त आयोग	१,२६,००४	२३६	१%	६ महिने	सु. बे
४	निंबोडी येथे पानी पुरवठा योजना दुरुस्त करणे.	१५ वित्त आयोग	१,४४,०७०	२३६	१%	६ महिने	सु. बे
५	कौठाळा येथे पानी पुरवठा योजना दुरुस्त करणे.	१५ वित्त आयोग	१,४३,६२०	२३६	१%	६ महिने	सु. बे
६	निंबोडी येथे पानी पुरवठा योजना दुरुस्त करणे.	१५ वित्त आयोग	१,४३,६४४	२३६	१%	६ महिने	सु. बे

(१) निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केलेला असून कोऱ्या निविदा संच दि. ०७/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून दि. १४/१०/२०२४ सायं. १७.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) निविदा दर टाकून सिलबंद लिफाफ्यामध्ये ग्रामपंचायत कार्यालयात सादर करता येतील. (२) निविदा संदर्भात सविस्तर माहिती अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. तसेच ब – १ निविदा संच फॉर्म ग्रा. पं. मध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे. (३) निविदा १५/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० ग्रा.पं. हुच.ग्रा.प.कौठाळा येथे उघडण्यात येतील. (४) निविदा अटी व शर्ती मध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क ग्रा. पं. ने राखून ठेवला आहे. (५) निविदे सोबत आवश्यक ती सर्व कागदपत्र जोडावे.

सही
ग्रा. पं. अधिकारी ग्रा. पं. हुच.ग्रा.प.कौठाळा
ता.पाथर्डी जि.अहमदनगर

सही
सरपंच ग्रा. पं. हुच.ग्रा.प.कौठाळा
ता.पाथर्डी जि.अहमदनगर

मुकुंदनगर फ्रेंड सर्कलच्यावतीने सामाजिक उपक्रमांनी रियाज सय्यद यांचा वाढदिवस साजरा

नगर – रियाज सय्यद यांचा वाढदिवस जुने मुकुंदनगर फ्रेंड सर्कलच्या वतीने साजरा करुन शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच गोरगरीबांना अन्नदान करण्यात आले. यापरांगी शम्स खान, उद्योजक इजाज सय्यद, शाहीद शेख, मेहराज शेख, सोनू शेख, शाहरुख शेख, नवेद शेख, शोएब शेख, अझलेन सय्यद, हमजा शेख, इब्रान सय्यद, जुनेद शेख, वसीम शेख आदी उपस्थित होते.

विसलेला अल्पसंख्यांक विभाग प्रमुख रियाज सय्यद यांचा वाढदिवस जुने मुकुंदनगर फ्रेंड सर्कलच्या वतीने साजरा करुन शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले, तसेच गोरगरीबांना अन्नदान करण्यात आले. (छाया–बबलू शैख)

रियाज सय्यद म्हणाले की, सालाबादप्रमाणे माझा वाढदिवस जुने मुकुंदनगर फ्रेंड सर्कलच्या वतीने सामाजिक उपक्रमांनी साजरा करुन समाजातील वंचितांना मदत करण्यात आली. वाढत्या महागाईच्या काळात गरजूंना मदत करण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. नगरकांची कामे करताना आपण कधीही भेदभाव करीत नाही. सर्वांना समान न्याय या पद्धतीने काम करीत आहे. अडल्या नडल्यांना मदत हेच आपल्या जीवनाचे ध्येय असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

जाहीर निविदांतर्गत खुली निविदा सूचना

ग्रामपंचायत घुमटवाडी. ता. पाथर्डी जि.अहमदनगर यांचे कडून जिल्हा परिषद नोंदणीकृत कंत्राटदार यांच्या मार्फत दोन लिफाफा पद्धतीने खालील कामाच्या निविदा मागवत आहे.

अ. नं.	कामाचे नाव	योजना	निविदा रक्कम	निविदा संचाची रक्कम	बयाना रक्कम	कामाची मुदत	अधिकृत ठेकेदार वर्ग
१	जि.प.शाळेत शौचालय बांधकाम करणे.	स्व.भा.गी	२,५२,४१२	२३६	१%	६ महिने	खुला

(१) निविदा अटी व शर्ती इ.बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केलेला असून कोऱ्या निविदा संच दि. ०७/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून दि. १४/१०/२०२४ सायं. १७.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) निविदा दर टाकून सिलबंद लिफाफ्यामध्ये ग्रामपंचायत कार्यालयात सादर करता येतील. (२) निविदा संदर्भात सविस्तर माहिती अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. तसेच ब – १ निविदा संच फॉर्म ग्रा. पं. मध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे. (३) निविदा १५/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० ग्रा.पं. घुमटवाडी येथे उघडण्यात येतील. (४) निविदा अटी व शर्ती मध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क ग्रा. पं. ने राखून ठेवला आहे. (५) निविदे सोबत आवश्यक ती सर्व कागदपत्र जोडावे.

सही
ग्रा.पं. अधिकारी ग्रा.पं. घुमटवाडी
ता.पाथर्डी जि.अहमदनगर

सही
सरपंच ग्रा.पं.घुमटवाडी
ता.पाथर्डी जि.अहमदनगर

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग अहमदनगर
ई–निविदा सुचना क्रं. २४ सन २०२४–२५

दुरध्वनी क्रमांक – ०२४१ / २३२५३३४ फॅक्स नं. ०२४१/२३२५०८६
मुख्य संकेतस्थल –https://mahatenders.gov.in e-mail- ahmednagar.eee@mahapwd.gov.in

संक्षिप्त ई–निविदा सुचना

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अहमदनगर(दुरध्वनीक्रमांक ०२४१/२३२५३३४ / २३२५०८६) हे श्रीगोंदा जि. अहमदनगर येथील ४ कामांसाठी ई–१ तसुचनाद्वारे मोहतबंद निविदा, सा.बां. खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून ई–निविदा, ई प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविले आहेत. निविदा कामाबाबत शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in वेबुन डाऊनलोड करण्यात यावी.

तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अहमदनगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

अ.क्र.	कामाचे नांव	अंदाजित रक्कम (रु.लाख)
१.	गोपेवाडी येथे भाजीपाला बाजारतळ सुधारणा करणे, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर	रु.१६७.४४
२.	गोपेवाडी कौठा येथील सडई ते कौठा अनारे रोड रस्ता करणे ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर	रु. १११.१० लक्ष
३.	गोपेवाडी येथे बाजारतळ कॉंक्रीटीकरण करणे. ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर	रु.८२.६८ लक्ष
४.	गोपेवाडी येथील पिसा येथे बाजारतळ विकसित करणे करणे. ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर	रु.८१.०६ लक्ष

–निविदा फिसी कालावधी दि. ४/१०/२०२४ ते ११/१०/२०२४, १८.०० सा. पर्यंत, निविदा उघडणे दि. १२/१०/२०२४, १८.०० वा. नंतर अ.क्र. १ कामांची निविदापूर्व बैठक, दि. ८/१०/२०२४ रोजी दु. १३.३० वा. अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, अहमदनगर यांचा कार्यालयामध्ये आयोजित केलेली आहे.

सविस्तर निविदा सुचना व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
1. www.mahapwd.com
2. Main Portal - https://mahatenders.gov.in

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग,
अहमदनगर

तिळवण तेली समाज ट्रस्टच्या मंदिरात नवरात्रौत्सवातील देवीची आकर्षक रुपे

नगर – नवरात्रौत्सवानिमित्त तिळवण तेली समाज ट्रस्टच्या दाळमंडई, संताजी भवन येथे स्थापन करण्यात आलेल्या देवीची दररोज विविध रुपात पुजा बांधण्यात येते. आजपर्यंत नंदीवतील विराजमान, कमळावरील विराजमान, व तुळजाभवानी तसेच फळांची महापुजा आदिंची वेगवेगळी रुपे साकारण्यात आली, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी दिली.

तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने दरवर्षी संताजी भवन विझ्ल–रुक्मिणी मंदिरात घटस्थापना करुन देवीची मुर्ती बसविण्यात आली आहे. नवरात्रौत्सवानिमित्त विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात येत असते. दररोज सायंकाळी ४ वा. भजन, सायं ७.३० वा. संबळ वादनावर आरती होत असते. यावेळी समाज बांधव व भाविक उपस्थित असतात.

नवरात्रोत्सवात देवीची दररोज वेगवेगळ्या रुपातील बांधण्यात येणारी पुजा ही आकर्षक व मनमोहक असते. देवीचे हे रुप पाहण्यासाठी अनेक भाविक दररोज येथे येतात.

९ ऑक्टोबरला महाराष्ट्राची कुलस्वामीनी श्री जगदंबा तुळजाभवानी मातेची पालखी मिरवणुक व मुक्काम असणार आहे. १२ ऑक्टोबरला विजयदशमीनिमित्त सिमोलंघन कार्यक्रम होणार आहे. नवरात्रोत्सव कार्यक्रम यशस्वीतेसाठी ट्रस्टचे अध्यक्ष प्रसाद शिंदे, उपाध्यक्ष मनोज क्षीरसागर, सचिव शोभना धारक, खजिनदार प्रकाश सैंदर, विश्वस्त सागर काळे, दत्तात्रय डाळजकोळे, गोकूळ कोटकर, शशिकांत देवकर, सौ.निता लोखंडे आदि प्रयत्नशिल आहेत.

कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, अहमदनगर

जाहीर ई–निविदा सुचना क्रमांक अहमदनगर - 10/2024-2025

अहमदनगर जिल्हातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत देखभाल व दुरुस्ती व ५ वर्ष देखभाल व दुरुस्तीच्या ५ पॅकेजेसची ७ कामे एकूण अंदाजित किंमत रुपयाना रू. ३६१५.०७ लाख व देखभाल व दुरुस्ती रुपयाना रू. २४८.२२ लाख ई–निविदा मागविण्यात येत आहेत.

सदर कामांची ई–निविदा https://www.pmgsytenders.gov.in या वेबसाईटवर दि. 04/10/2024 पासुन उपलब्ध होईल.

ई–निविदा सुचना क्र.	एकुण कामे	एकत्रित अंदाजित किंमत
10/2024-2025	7 कामे	रू. 3615.07 लाख

सही/–
(प्र.मु.गेब्राई)
कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना,
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, अहमदनगर

श्रमणसंघीय युवाचार्य महेंद्रऋषीजी म.सा. व श्रुतमुनीजी म.सा. यांच्या जन्मदिनानिमित्त गुणानुवाद तसेच अक्षरमुनीजी म.सा. यांच्या ३६ उपासांच्या पचकावणी निमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी साधू तसेच हस्तीमल मुनोत आदी.

महेंद्रऋषीजी म.सा., श्रुतमुनीजी म.सा.यांच्या जन्मदिनानिमित्त गुणानुवाद कार्यक्रम उत्साहात

आनंदधामच्या प्रांगणात श्रावक श्राविकांची अलोट गर्दी

नगर – श्रमणसंघीय युवाचार्य महेंद्रऋषीजी म.सा. व कर्नाटक गजकेसरी गुरुदेव गणेशलालजी म.सा.यांचे शिष्य दक्षिण केसरी गुरुदेव मिश्रीलालजी म.सा.यांचे सुशिष्य तसेच आचार्य सम्राट डॉ.शिवमुनीजी म.सा.यांचे अज्ञानुवर्ती उपप्रवर्तक श्रुतमुनीजी म.सा. यांच्या जन्म दिनानिमित्त रविवारी आनंदधाम येथे श्री सिध्दी पार्श्व जपतप महोत्सव उत्साहात पार पडला. भाविकांच्या अलोट गर्दीत झालेल्या या कार्यक्रमात श्रावक श्राविकांनी गुरु गुणानुवाद केला.

यावेळी अक्षरमुनीजी म.सा.यांच्या ३६ उपवासांचा पचकावणी करण्यात आली तसेच त्यांना महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा.यांनी जिनशासक प्रभावक उपाधीने सन्मानित केले. तपस्विनी विनीतदर्शनाजी म.सा. यांच्या महासर्वोत्रभद्र तपानिमित्तही त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., उपप्रवर्तक सिध्दार्थ मुनीजी म.सा., सत्यप्रभाजी म.सा., उपप्रवर्तिनी सन्मतिजी म.सा., यांच्या पावन सान्निध्यात हा विशेष कार्यक्रम झाला. सकाळी ४५ दिवसांच्या जपतप महोत्सवात सहभागी होणाऱ्या तपस्वींचा उज्वलनगर येथून आनंदधामपर्यंत वरघोडा काढण्यात आला. मास खमण तप, आयम्बिल सहित सिध्दि तप, श्री पार्श्व तप आराधना करणाऱ्या सर्व तपस्वींचा आनंदधामच्या प्रांगणात सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी जैन श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत, उपाध्यक्ष आनंदराम मुनोत व सतीष लोढा, सेक्रेटरी संतोष बोथरा, सहसेक्रेटरी संतोष गांधी व नितीन कटारिया, बडीसाजन श्री संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, श्रावक संघाचे अभय लुणिया, प्रितम गांधी, आनंद चोपडा, राजेश बोरा, बाळू बोरा, अनिल मेहेर, रतिलाल कटारिया, अशोक पारख, नितीन शिंगवी, अमोल कटारिया, अनिल दुगड, मनिषा मुनोत, सरोज कटारिया आदी उपस्थित होते.

कुंदनऋषीजी म.सा. म्हणाले, साधूसाध्वीजींच्या धर्म प्रभावनेमुळे समाजाला दिशा मिळत असते. आज ज्यांचा जन्मदिवस साजरा झाला ते दोघेही साधू अतिशय चांगल्या पध्दतीने जिन शासनाची प्रभावना करीत आहेत. जप तप हे मानवी जीवन सार्थकी लावणारे असतात. आचार्यश्रींच्या पावन भूमीतील श्रावक श्राविका अतिशय तन्मयतेने जपतप करीत असतात. त्यांच्यामुळे इतरांनाही धर्म कार्याची प्रेरणा मिळते. अशा तपस्वींचा गौरव होणे आनंददायी असल्याचे त्यांनी म्हटले.

या कार्यक्रमास श्रुतमुनीजी म.सा.यांचे बंगलोर, चेन्नई, रामकोट, हैदराबाद, शिरुर, बीड, छ.संभाजीनगर, करमाळा, सेलू, जालना आदी भागातील परमभक्त उपस्थित होते.

स्वागत करताना हस्तीमल मुनोत म्हणाले, आनंदधामच्या पवित्र प्रांगणात श्रुतमुनीजी म.सा. यांचा ऐतिहासिक चातुर्मास पार पडत आहे. आज महेंद्रऋषीजी म.सा., श्रुतीमुनीजी म.सा.यांचा जन्मदिन साजरा करण्याचे भाग्य श्रावक श्राविकांना लाभले. समाजात धार्मिकता वाढली तर सुसंस्कृत पिढी तयार होते. जप तप महोत्सवात तपस्वींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत तप केले. त्यांचा सन्मान करताना ही विशेष आनंद होत आहे. तपस्वी बहुमान लाभार्थी अशोक बन्सीलाल पारख व चेन्नई स्थित सुरेशचंद, किरणबाई, महेश, सुरेंद्र, प्रदीप कोठारी परिवार होत. कार्यक्रमानंतर सुजाता राजेंद्र लोढा परिवाराच्यावतीने भक्त निवास येथे गौतम प्रसादीची व्यवस्था करण्यात आली होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार संतोष गांधी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी जैन श्रावक संघासह श्री वर्धमान महिला मंडळ व युवकच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

'केस प्रेझेन्टेशन'मध्ये आशिया खंडात डॉ.भक्ती कटारिया यांचा प्रथम क्रमांक

नगर – बालरोग तज्ञ व फेलोशिप पिडीयाट्रिक इंडोक्रीन्यूलॉजी डॉक्टर भक्ती कटारिया– दुगड यांना आंतरराष्ट्रीय (आशिया खंडातील) एन्डक्रोनोलॉजी परिषदेत सादर केलेल्या शोध निबंधास पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. त्यांनी एशियन पेसिफिक पीडीयाट्रिक एन्डक्रोनोलॉजी सोसायटीतर्फे दिल्ली येथे झालेल्या परिषदेत सादरीकरण केले. त्यावेळेस जपान, थायलँड, फिलिपाइन्स, इंडोनेशिया, बांग्लादेश, व्हिएतनाम, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशांतील ५६ डॉक्टरांनी सादरीकरणात सहभाग घेतला होता. परदेशातील बालरोग एन्डक्रोनोलॉजी तसेच भारतातील वाडिया व इतर रुग्णालयातील तज्ञांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

त्यांनी नुकतीच फेलोशिप एन्डक्रोनोलॉजी याची परीक्षा दिली आहे. वाडीया चिल्ड्रन हॉस्पिटल मुंबई येथील डॉक्टर सुधा राव यांनी डॉ. भक्ती यांना मार्गदर्शन केले त्या नाशिक येथील प्लास्टिक सर्जन डॉ. आनंद दुगड यांच्या पत्नी आहेत.

स्वर्गीय शांतीलाल व कांतीलाल कटारिया (सर) यांची नात तसेच आमी संघटनेचे माजी अध्यक्ष राजेंद्र कटारिया व संगीता कटारिया यांची मुलगी आहे. तिला तिचे सासरे व बालरोग तज्ञ रिखबचंद व सासू डॉक्टर सुष्मा दुगड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

यशराज ढमाळ याची सब लेफ्टनंटपदी निवड

नगर – इंडियन नेव्ही साठी दिलेल्या देश पातळीवरील परीक्षेत उत्तीर्ण होऊन नेव्ही मध्ये यशराज ढमाळ याची सब लेफ्टनंट पदी निवड झाली आहे.

यशराज याला लहानपणापासून लष्करात जाऊन देशसेवा करण्याची आवड होती. यातूनच त्याने प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आर्मी पब्लिक स्कूल येथे घेतले. त्यानंतर इंडियन मेरिटियन इंडियन युनिव्हर्सिटी कोलकत्ता येथे मरीन इंजिनिअरिंग पूर्ण झाल्यानंतर यूपीएससी परीक्षा देऊन इंडियन नेव्ही मध्ये सब लेफ्टनंट पदी त्याची निवड झाली आहे.

यशराज ढमाळ हा भूविकास बँकेचे माजी अध्यक्ष कै. यशवंतराव ढमाळ यांचा नातू असून पाथर्डी तालुक्यातील चितळी येथील प्रवीण ढमाळ व मंडल अधिकारी सौ. अमृता ढमाळ यांचा तो चिरंजीव आहे.

जन्मदिवसाच्या अनंत शुभेच्छा! ।। आनंद गुरवे नमः ।।

आनंदाचे डोहि आनंद तरंग

लक्षावधी वर्षांनी एखादा सूर्य निर्माण होतो. किरयेक कल्प साघडल्यावर कस्तुरीत मृग सापडतो. हजारो शिंपले उघडल्यावर एखादा मोती दिसतो. असंख्य मानव जन्मास येतात परंतु आपल्यासारखा एखादाच जन्माचं सोनं करतो. असेच अपूर्व व्यक्तिमत्त्व आहे योगीराज प्रवियऋषीजी महाराजांचे. ७.१०.१९५७ साली यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील घोडेगाव या छोटाच्या गावात साधारण बालकाप्रमाणे झाला. परंतु जीवन मात्र असाधारण आहे. आकाशात दिव्यतेने चमकणारा तारा या भूमीवर प्रकाशपुंज बनून माता चंपाबाई यांच्या कुक्षीत सामावला आणि आज ७ ऑक्टोबर या शुभदिवशी पिता दगडूलाल देसर्डा यांच्या मांडीवर विसावला. स्थिरावला. अतिशय मर्यादाशुध्द, भक्तीयुक्त कुटुंबात संगोपन होत होते बाळराजांचे. लहानपणापासूनच समवयीन मुलांपेक्षा वेगळंच विश्व... वेगळ्याच आवड– निवडीत समायचे. वेगळीच जीवनपद्धती साकारायचे. त्यांची ही अद्वितीयता – हे वेगळेपण लक्षात आलेले, हेरले त्यांचे प्राण त्यांच्या गुरुदेवांनी आणि गुरुदेवांच्या भगवंताच्या नजरेने बघून भगवंत व्हावं हे बाळकडू पाजलं जन्मदाते वडिलांनी. बाळकडूमध्येच भक्ती – एकनिष्ठा – प्रामाणिकता अगदी भरभरून दिली आणि गुरुदेवांनी या बाळराजातील राजेपण पारखलं आणि आपल्या अनंत कृपेने ते जपलं–जोपासलं. त्यांच्या वात्सल्याने हा निश्चयाचा महामेरू अवघ्या विश्वाचा आधार बनून जगाला वात्सल्याचे अमृत पाजलं आहे प्रभू वचनागळा.

स्वतःची साधना साधता–साधता असे कार्यक्रम निर्माण करीत आहेत कि युगानुयुगे येणारी पिढी धर्माशी बांधली जाणार आहे. ते आपल्या प्रबोधनात आणि शिबिरात सांगतात कि तपावपूर्ण आयुष्य जगून तरुणपणीच मरण्यापेक्षा समाधानी आयुष्य जगून समाधिमरण प्राप्त करा. मला आवर्जून सांगावेसे वाटते कि त्यांचे जवळपास १२ कार्यक्रम कार्यरत आहेत परंतु प्रत्येक कार्यक्रम हा गर्भधारणा – डोहाळे आणि सुखद बाळंतपणाच्या प्रक्रियेतून निर्माण झालेले आहे. कोणतेही कार्यक्रम दत्तक घेतलेले नाही. समाजाचे निरीक्षण–परीक्षण करताना जाणवलेल्या दुःखातून – दीर्घदृष्टीत दिसलेल्या आपत्तीतून समस्त विश्वाला दुःखमुक्त आणि मनाच्या – आत्म्याच्या समृद्धीचा मार्ग प्रदान करण्यासाठी हे कार्यक्रम म्हणजे प्रगल्भ आपत्याचा जन्मच समजावा. त्यांच्या समोर एक ध्येय आहे त्यामुळे त्यांच्यातील क्षमतेच्या ठिणगीला हवा मिळते आणि क्षमतेच्या ठिणगीचे रुपांतरण सम्यक् पराक्रमाच्या ज्योतीत रुपांतरीत होते आणि त्यांचे हे रुपांतरण केले त्यांनी आराध्य दैवत आचार्यसम्राट आनंदऋषीजी महाराज यांनी. हे भगवंतच आहे ही दृष्टी दिली, ही भावना रुजवली त्यांच्या वडिलांनी आणि त्या दृष्टीनेच प्रकाश नावाच्या या अवघ्या १५ वर्षाच्या बालवयात प्रकाशाचा जणू झोतच निर्माण केला त्या गुरुमाऊलींच्या कृपेने आणि हा दिव्य प्रकाश भगवान महावीरांचे विचार विश्वात पोहोचवणारा प्रकाशदूत बनला आहे ऋषि प्रविण या रूपाने, आणि या सूर्याची वाटचाल सुरू झाली १९७४ पासून. बारकाईन समाजाच्या समस्यांचे आकलन करून प्रत्येक समस्येचे समाधान देणारे कार्यक्रम सुरू केले. या कार्यक्रमात काही कार्यक्रम त्यांची आस्था वाढविणारे काही कार्यक्रम समाजव्यवस्था निर्माण करणारे आहेत. जसे गौतमनिधीचा कार्यक्रम हा जैन समाजाला समृद्ध–सक्षम बनविणारा कार्यक्रम आहे. नवकार कलश द्वारा प्रत्येक घरांघरांत श्रद्धापीठाची स्थापना करीत आहेत. लहान मुलांना धार्मिक शिक्षण देणारी सुंदर पाठशाळेचे अपूर्व कामही ते करीत आहेत. तसेच संपूर्ण जगभरात प्रभू महावीरांचे वचन पोचहवणारी जिनेश्वरी त्यांनी निर्माण केली आहे. असेच आस्था निर्माण करणारेही कार्यक्रम त्यांनी दिले आहेत. मनाला शांती मिळावी म्हणून नाते तोडावे कि नात्यात शांती शोधावी याचे सुंदर मार्गदर्शन करणारे, दाम्पत्य जीवनात देवत्व आणणारा कार्यक्रम कपल शिबीर आहे आणि हे आई धरतीमाता आणि पिता आकाश बनले कि संतती सूर्य बनणारच या वात्सल्याचे जागरण पालकत्व जागवणारा पालक संस्कार शिबीर तसेच कुशीत येणाऱ्या जीवाचे ममतेने भाग्य बदलता येते हे सूत्र अर्हम् गर्भसंस्काराच्या माध्यमातून प्रत्येक मातेच्या मनात प्रवाहित करीत आहेत.

आई–वडील भगवत्स्वरूप बना आणि आपल्या संततीला देवत्वाचे वरदान देणारे देवस्वरूप पालक बनविण्याची कला पालक शिबीरात शिकविली जाते. तसेच तुमची जीवनशैली जीवनक्रिया ज्याच्यावर जर आपण प्रेम केले तर तीच उर्जा आपल्या जीवनाला उत्कृष्टतम आकार देते. अशा अनेक ज्वलंत प्रश्नांची उत्तरे देणारा कल्पवृक्ष आहे अर्हम् विज्ञा ही संस्था. प्रत्येक संकटाला संधी बनविता येते आणि मिळालेल्या संधीला सुद्धा सुवर्णसंधी बनवता यावी याचे सुंदर प्रशिक्षण देणारे शिबिर आहे. कर्मा आणि नात्याशिवाय जगणं अवघड आहे परंतु नात्यांशी निगडित राहणंही सोपं नाही. त्यासाठी प्रत्येक नात्यातील कुरकुर कशी कवितेत रुपांतरीत करावी कारण दाराची कुरकुर झाली कि पूर्वी म्हटलं जायचं दारात तेल घाल. तेल वजा घराचे दरवाजे आणि मनाचे दरवाजेही सारखीच असतात. प्रेमाचं–मायेचं खतपाणी – तेल नसेल तर ती कुरकुरतात ती नात्यांतील कुरकुर जाणून त्यात वेळेवर तेल घालण्याचे हे सर्व कार्यक्रम कारण वेळेवर घातलेला एक टाका पुढचे नऊ टाके वाचवतो हा शाळेत शिकलेला सुविचार शुचिवर जीवनात आणावा हे प्रविणऋषीजी महाराजांचे उद्देश आहे. तुम्ही भूतकाळाचे कैदी होण्यापेक्षा भविष्याचे शिल्पकार बना, असे आवाहन ते सतत करीत असतात. भगवान महावीरांचे वचन त्यांनी लीपीतून मुक्त करून जगण्यात गुंफून टाकले आहेत. प्रत्येक व्यक्तीत अनंत क्षमता आहे. त्या उर्जेला ध्यानात रुपांतरीत करण्यासाठी पुरुषाकार ध्यान साधनेचा अविष्कार त्यांनी केला. ह्या प्रकाश पुंजाच्या माध्यमातून अवघ्या मानवजातीला प्रकाशयात्री बनविते आहेत.

आशा या मानवजातीला प्रकाशयात्री बनविणाऱ्या संताच्या चरणी एकच प्रार्थना – त्यांच्या जन्मदिनानिमित्त एकच मंगलकामना...

सुदिनम् सुदिनम् जन्मदीनं तव
भवतु मंगलं जन्मदिनं
चिरंजीव कुरु कितिंवर्धनम्
चिरंजीव कुरु पुण्यवर्धनम्
सुखं जीव कुरु कितिंवर्धनम्
विजयी भव सर्वत्र सर्वदा
जगति भवतु तव यशोगाथा...

आनंद उपासिका – साध्वी ओजस

अर्थजगत

'एनपीएस वात्सल्य योजना' आता लागू होण्याच्या तयारीत आहे. यानुसार आई वडिल किंवा पालक त्यांच्या पाल्यासाठी एकाधाने भविष्यातील तरतूद म्हणून पेन्शन योजनेत गुंतवणूक करू शकतात. वास्तविक ही योजना राष्ट्रीय पेन्शन योजनेचे (एनपीएस) नवे रुप आहे. ज्येष्ठ नागरिक ज्याप्रमाणे एनपीएसनुसार खाते सुरू करतात, त्याचप्रमाणे आई वडिल किंवा पालक हे मुलांसाठी एनपीएसचे खाते सुरू करू शकतात. मुलगा अठरा वर्षांच्या होईपर्यंत दरमहा एक निश्चित रक्कमेचे योगदान देऊ शकतात. वार्षिक किमान योगदान हजार रुपये आहे आणि कमाल योगदानाला मर्यादा नाही. एनपीएस वात्सल्य योजना ही सध्याच्या एनपीएस योजनेचा भाग असून प्रामुख्याने पाल्यांचे भवितव्य डोळ्यासमोर ठेऊन आणली आहे.

मुलांच्या भविष्याला आर्थिक कवच

'एनपीएस वात्सल्य'साठी पात्रता

'एनपीएस' योजनेच्या पात्रतेसाठी अठरा वर्षापेक्षा कमी वयोमर्यादेचा भारतीय नागरिक, अनिवासी भारतीय (एनआरआय) आणि भारतातील परकी नागरिक (ओसीआय) हे अल्पवयीन मुलांसाठी खाते सुरू करण्यात पात्र आहेत. ही योजना अल्पवयीन पाल्यांच्या सर्व भारतीय पालक आणि माता पित्यांना लागू होते.

सज्ञान झाल्यानंतर खात्याच्या स्वरुपात बदल

एखाद्या पालकाने अल्पवयीन मुलांच्या नावाने योजना सुरू केली असेल आणि तो मुलगा १८ वर्षांचा झाल्यास त्याचे एनपीएस वात्सल्य नावाने सुरू झालेले खाते हे आपोआप मूळ एनपीएस खात्यात परावर्तित होते. वास्तविक ही योजना लहान पाल्यांनाा एनपीएसमध्ये सामावून घेण्यासाठीच आणली आहे. एकापरीने पालक किंवा आई वडिल हे पाल्यांना आर्थिक सुरक्षा देण्याबरोबरच सेवानिवृत्तीसाठी एक नवीन पर्याय उपलब्ध करून देतात.

अर्ज कसा करावा?

या योजनेसाठी अर्ज करणे सुलभ आहे. एखादा पालक ऑनलाइन अर्ज करत असेल तर त्याचे काम काही मिनिटात पूर्ण होईल. ई-एनपीएस संकेतस्थळावर किंवा पीओपीच्या माध्यमातून अल्पवयीन मुलांसाठी एनपीएस खाते सुरु करता येते. पीओपी म्हणजे 'पोंइट ऑफ प्रझेन्स' यातंगत इंडिया पोस्ट आणि सर्व प्रमुख बँकांमध्ये अशा प्रकारचे खाते सुरु करण्याची सुविधा उपलब्ध आहे. ऑनलाइनचा विचार केल्यास ई-एनपीएस संकेतस्थळावर एनपीएस वात्सल्य टॅबमध्ये नोंदणी करण्याच्या पर्यायवर क्लिक करा. पालकाची जन्मतारीख, फोन नंबर, मोबाईल नंबर आणि ईमेलची नोंदणी करा. त्यानंतर पालकाच्या मोबाईल नंबरवर किंवा मेलवर ओटीपी येईल. ओटीपी येताच त्याचे व्हेरिफिकेशन पूर्ण होईल आणि अर्जदाराला स्क्रीनवर अर्ज दिसेल. यानंतर केन्टीन्यू म्हणजेच सुरू ठेवण्यावर क्लिक करा आणि पाल्यांशी संबंधित कागदपत्रे अपलोड करा. याचवेळी किमान हजार रुपयांनी गुंतवणूक करा. पैसे जमा होताच मुलांच्या नावाने एनपीएस वात्सल्य योजनेचे खाते उघडले जाईल.

कोणती कागदपत्रे गरजेची?

एनपीएस वात्सल्य योजना सुरू करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांत पालकांबरोबरच मुलांचे केवायसी व्हेरिफिकेशन करणे देखील गरजेचे आहे. कागदपत्रांत पालकाचे आधार कार्ड, अल्पवयीन पाल्याचा जन्माचा दाखला, पालकाची स्वाक्षरी, एनआरआय पालकांसाठी पारपत्राची स्कॅन कॉपी, ओसीआय प्रकरणात परदेशातील पत्त्याचा पुरावा आणि त्याची स्कॅन कॉपी, एनआरआय किंवा ओसीआय नागरिकांच्या बाबतीत बँक खात्याचा पुरावाही जोडावा लागेल.

पैसे काढण्याचे नियम : एनपीएस वात्सल्य योजनेतील मुलगा १८ वर्षाहा होण्याअगोदर कही प्रमाणात पैसे काढू शकतो. एनपीएस वात्सल्य योजनेतून कही नियमांच्या आधारे पालक किंवा आई वडिल पैसे काढू शकतात. योजना घेतल्यानंतर तीन वर्षानंतर पैसे काढण्याचा पर्याय आहे. याप्रमाणे खात्यात जमा असलेल्या एकूण रक्कमेपैकी २५ टक्के

रक्कम काढता येते. मुलगा किंवा मुलगी अठरा वर्षाचा होईपर्यंत पैसे काढण्याची मुभा तीन वेळेस देण्यात आली आहे. शिक्षण, ७५ टक्क्यांपेक्षा अधिक अपंगत्व आणि अन्य गंभीर आजारपणाच्या उपचारासाठी पैसे काढता येतात.

योजनेतून बाहेर पडण्याचा पर्याय : मुलगा सज्ञान झाल्यानंतर तो अन्य पेन्शन योजना घेत असेल तर तो या योजनेतून बाहेर पडू शकतो. या योजनेतून बाहेर पडल्यानंतर एनपीएस वात्सल्य खात्यातील किमान ८० टक्के रक्कम ही नव्याने उघडण्यात येणाऱ्या वार्षिक याजनेत गुंतवावी लागेल आणि शिल्लक राहिलेली वीस टक्के रक्कम एकाचवेळी काढता येणार आहे. खात्यावर अडीच लाखांपेक्षा कमी रक्कम असेल, तर संपूर्ण पैसे काढता येऊ शकतात.

दुर्दैवी घटना घडल्यास : पाल्यांसमवेत एखादी दुर्दैवी घटना घडल्यास त्याच्या खात्याची संपूर्ण रक्कम ही पालकाच्या खात्यावर जमा केली जाते. तसेच योजनेत योगदान देणाऱ्या पालकाचा मृत्यू झाल्यास नवीन केवायसीच्या माध्यमातून दुसऱ्या पालकाचे नाव जोडले जाईल. माता-पिता या दोघांचाही मृत्यू झाल्यास मुलांचे कायदेशीर पालक हे मुलगा १८ वर्षाचा होईपर्यंत कोणतेही अनुदान न देता योजना सुरू ठेऊ शकतील. त्यानंतर ती रक्कम लाभार्थ्यास दिली जाईल किंवा कायम ठेवली जाईल.

योजनेचे फायदे : एनपीएस वात्सल्य योजना ही मुलांत बचतीची सवय वाढविण्याचे काम करेल. मुलगा अठरा वर्षाचा होताच हे खाते आपोआप एनपीएसमध्ये परावर्तित होईल. यानंतर तो स्वतंत्र रुपाने एनपीएसमध्ये योगदान देऊ शकतो. एनपीएस योजना ही पोर्टेबिलिटी प्रदान करते. म्हणजेच एनपीएसला धक्का न लावता एखाद्या व्यक्तीला नोकरी बदलता येते. खातेदार पाल्य सज्ञान होतो तेव्हा एनपीएस वात्सल्य योजना ही मूळ एनपीएस खात्याचे रुप धारण करते. यानुसार तो सेवानिवृत्तीपर्यंत ही योजना सुरू ठेऊ शकतो आणि निवृत्तीसाठी एक चांगला निधी उभा करू शकतो. एनपीएस वात्सल्य हा एक चांगला रिटायरमेंट फंड पर्याय आहे. कारण मुलगा अल्पवयीन असतानाच त्यात योगदान सुरु होते आणि हा कालावधी खूप मोठा आहे. सेवानिवृत्तीच्या काळात एनपीएस खात्यातील जमा रक्कमेपैकी ६० टक्के पैसे काढता येतात. ही योजना कमीत कमी वयोमर्यादेत मुलांना आर्थिक व्यवस्थापन आणि शिस्त शिकवण्याचे काम करते. ◆◆◆

म्युच्युअल फंडधारक आहात?

म्युच्युअल फंड हा आपल्या गुंतवणुकीवर दमदार परतावा मिळवू पाहणाऱ्यांमध्ये लोकप्रिय पर्याय बनला आहे; पण कोणता म्युच्युअल फंड योग्य आहे आणि त्यावर किती कर आकारला जातो हे देखील समजून घेणे आवश्यक असते. यासोबतच कर दायित्वेही देखील जाणून घेणे आवश्यक आहे.

* **सिंगल होल्डिंग:** नावाप्रमाणेच यामध्ये म्युच्युअल फंड युनिटची मालकी वैयक्तिक असते. ज्या गुंतवणूकदारांना त्यांच्या गुंतवणुकीवर पूर्ण नियंत्रण हवे आहे त्यांच्यासाठी हे योग्य आहे.
* **जॉइंट होल्डिंग:** यामध्ये दोन किंवा अधिक लोक संयुक्तपणे म्युच्युअल फंड युनिट्सचे मालक असतात. संयुक्त होल्डिंग दोन प्रकारांमध्ये विभागली आहे:

यापैकी सर्व्हाइव्हरमध्ये व्यवहारासाठी कोणत्याही होल्डरची स्वाक्षरी ग्राह्य मानली जाते. एक सदस्याच्या मृत्यूनंतर, हयात असलेला सदस्य मालक बनतो. तर दुसऱ्या प्रकारात सर्व सदस्यांच्या स्वाक्षरीशिवाय या फंडातील व्यवहार पूर्ण होत नाही. होल्डिंग संदर्भातील निर्णय आपण ज्या बँक खात्यातून फंडात गुंतवणूक करणार आहोत त्या खात्यानुसार असावा. यावेरीज युनिट धारकाच्या दुर्दैवी मृत्यू झाल्यास सुरळीत हस्तांतरण आणि पेआउट सुलभ करण्यासाठी नॉमिनी करणे देखील महत्त्वाचे आहे.

फंड कॉर्नर

* जॉइंट होल्डिंगमध्ये आयकर रिटर्नमध्ये दुसऱ्या आणि तिसऱ्या सदस्यांची नावे आणि पॅन तपशील देखील द्यावे लागतात.
* म्युच्युअल फंड युनिट्स खरेदी आणि विक्री दरम्यानच्या कालावधीला होल्डिंग कालावधी म्हणतात.
* इक्विटी म्युच्युअल फंड, डेट म्युच्युअल फंड आणि हायब्रीड म्युच्युअल फंड यासारख्या प्रकारानुसार कर आकारणीचे नियम वेगळे असतात.
* म्युच्युअल फंडावर लावला जाणारा कर अनेक घटकांवर अवलंबून असतो.
* एखादा गुंतवणूकदार त्याच्या म्युच्युअल फंड युनिट्सची सुरुवातीच्या गुंतवणुकीच्या रक्कमेपेक्षा जास्त किंमतीला विक्री करतो तेव्हा भांडवली नफा होतो.
* भारतीय आयकर नियमांनुसार, दीर्घ गुंतवणुकीच्या कालावधीचा परिणाम सामान्यतः भांडवली नफ्यावर कर दर कमी होतो. गुंतवणूक दीर्घकाळ ठेवल्यास कर कमी भरावा लागतो. सर्व प्रकारच्या मालमत्तेच्या दीर्घकालीन भांडवली नफ्यावर १२.५% समान कर आकारला जाईल. अर्थसंकल्प २०२४ मधून गुंतवणूकदारांना मिळणारा इंडेक्सेशन फायदा काढून टाकण्यात आला असून यापूर्वी काही मालमत्तांवर इंडेक्सेशनसह २०% आणि इंडेक्सेशनशिवाय १०% एलटीसीजी कर लागू होता. अशाप्रकारे, आता इंडेक्सेशनशिवाय वाढीव एलटीसीजी कर २३ जुलै २०२४ पासून लागू झाला. ◆◆◆

भाड्याचे की स्वतःचे घर?



महागाईच्या काळात सर्वसामान्य नागरिकांना स्वप्नातील घर घेणे खूपच कठीण काम झाले आहे. एखाद्याने बँकेकडून कर्ज घेऊन घर खरेदी केले तरी त्याच्या देखभालीपोटी होणारा खर्च हा सर्वांनाच हाताळता येतो असे नाही. तरीही नागरिक घर खरेदी करण्याचे स्वप्न पाहतात आणि लवकरात लवकर ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करतात. अर्थात स्वतःची मालकीची मालमत्ता असेल आणि त्याची किंमत दरवर्षी वाढतच जाणार आहे, हे त्यांना ठाऊक असते. तसेच अडचणीच्या काळातही ही मालमत्ता मोलाची ठरु शकते. मात्र बहुतांश लोकांना घर खरेदी करण्यापेक्षा भाड्याने राहणे अधिक सोयीचे वाटते. त्यांच्या मते, भाड्याने घेतलेल्या घराची देखभाल करण्यासाठी पैसे द्यावे लागत नाही आणि मालमत्ता करायाही ताण नाही. केवळ भाडे आणि वीज बिल यासाठी तरतूद केल्यास आयुष्य आरामात व्यतित करता येते, असे त्यांचे म्हणणे आहे. साहजिकच प्रत्येकाचा विचार हा वेगळा असतो आणि निर्णयही. भाड्याच्या घरात राहणे चांगले की स्वतःच्या घरात राहणे अधिक उत्तम, हे जाणून घेऊ.

घर खरेदी करण्याचे फायदे

घर खरेदी किंवा भाडयाने घेणे हा एक महत्त्वाचा आर्थिक निर्णय समजला जातो. या दोन्ही पर्यायात वेगवेगळे फायदे आणि नुकसान आहेत. घर खरेदी करणे हे नेहमीच दीर्घकालीन गुंतवणूक म्हणून पाहिले गेले आहे. त्याचे मूल्य काळानुसार वाढत जाते. मालकीचे घर हे तुमच्या-माझ्या आयुष्यात स्थिरता आणि सुरक्षितता प्रदान करते. घर खरेदी केल्यानंतर प्राप्तिकरात सवलत मिळते आणि प्रामुख्याने गृहकर्जापोटी देण्यात येणाऱ्या व्याजावर सवलत मिळते. ती प्राप्तिकराच्या कलम ८० सी आणि २४ बी नुसार मिळते. याशिवाय घरेदी केल्यानंतर मनासारखा त्यात बदल आणि सजावट करता येतो. भाड्याच्या घरात असा बदल करता येत नाही. याशिवाय कुटुंबावर आर्थिक संकट येताच घराची विक्री करुन त्यातून बाहेर पडणे शक्य राहते. याप्रमाणे घर खरेदी करणे ही दीर्घकालीन स्थिरता आणि मूल्य वृद्धीसाठी एक चांगला पर्याय राहू शकतो.

तोटे काय?

कर्ज काढून घरखरेदीचा पर्याय आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य ठरत नाही, असे कही तज्ज्ञ सांगतात आणि त्यात तथ्यही आहे. याचे कारण या कर्जाघोटी २०-२५ वर्षांत प्रचंड रक्कम भरावी लागते. त्यातुलनेत बाजारभाव वाढत असले तरी मालमत्तेचे आयुष्यही वाढत जाऊन ती जुनी होते. दुसरी गोष्ट म्हणजे हे घर बाजारभावाने भलेही गुंतवलेल्या रकमेपेक्षा दुप्पट-तिप्पट किमतीला विकले गेले तरी त्यातून नवी मालमत्ता घेताना बाजारभावाप्रमाणेच घ्यावी लागते. तिसरा मुद्दा म्हणजे, सोने-एफडी-म्युच्युअल फंड यातील गुंतवणुकीतील हवी तेवढी रक्कम आपल्याला काढता येते. तसे मालमत्तेबाबत होत नाही. म्हणजेच

गुंतवणूक

तुम्ही खरेदी केलेल्या फ्लॅटची किंमत ४० लाख असेल आणि तुम्हाला १० लाखांची अचानक गरज भासली तर तुम्ही फ्लॅटमधील एखादी रूम विकू शकत नाही. या सर्वांचा विचार करता आणि मुख्य म्हणजे कर्जाच्या परतफेडीत जाणाऱ्या एकूण रक्कमेचा, घसाऱ्याचा विचार करता कर्ज काढून घरखरेदी हा व्यवहार्य पर्याय ठरत नाही.

भाड्याच्या घरात राहण्याचे लाभ

याऐवजी भाड्याच्या घरात राहण्याचे अनेक फायदे आहेत. घर खरेदी करण्याच्या तुलनेत तो एक आकर्षक पर्याय म्हणून सिद्ध होतो. सर्वात अगोदर भाड्याच्या घरात राहणे हे घर खरेदीच्या तुलनेत कमी खर्चिक आहे. यात डाउनपेमेंटची चिंता नसते आणि ही बाब घर खरेदीतील कळीचा मुद्दा ठरू शकतो. भाड्याच्या घरात राहण्याचा आणखी एक फायदा म्हणजे लवचिकपणा. तुम्ही नोकरी बदलत असाल किंवा लोकेशन आवडत नसेल तर सहजपणे घर बदलू शकता. याशिवाय भाड्याने राहत असल्याने प्रॉपर्टी टॅक्स, रिनोव्हेशन, पार्किंग यासारख्या अतिरिक्त खर्चापासून मुक्ती मिळते आणि त्याचवेळी या गोष्टी मालकी असताना कराव्या लागतात.

भाड्याच्या घराच्या नकारात्मक बाजू

भाड्याच्या घरात राहण्याने काही नुकसान देखील आहे. परिणामी मालकीचे घर असण्याची भावना मनात निर्माण होते. सर्वात मोठे नुकसान म्हणजे घरमालक आपल्याला कधीही घर रिकामे करण्यास सांगू शकतो. यामुळे आपले जीवनमान विस्कळीत होऊ शकते. शिवाय कितीही वर्षे भाड्याच्या घरात राहिलो तरी त्याचे मालक होऊ शकत नाही. दुसरीकडे घर खरेदी करणे ही एक गुंतवणूक मानली जाते आणि ती आयुष्यभर कामी येते. कालानुसार त्याच्या मूल्यांत वाढ होते. भाड्याने राहताना आपल्याला मेंटेनन्स आणि अन्य खर्चाची चिंता नसते, परंतु स्थैर्यावर टांगती तलवार राहते.

विचारपूर्वक निर्णय

घर खरेदी करताना अनेक आर्थिक बाजूंवर विचार करणे गरजेचे आहे. तुम्ही पहिले घर खरेदी करत असाल तर अधिकांचिक स्वतःचे पैसे भरा आणि कजांची रक्कम कमी घ्या. या कारणांमुळे गृहकर्जाचा कालावधी जेवढा कमी राहिल, तेवढा मासिक हप्ता अधिक राहिल. यानुसार कमी वयातच कर्जमुक्ती राहिल आणि अन्य ठिकाणी गुंतवणूक करण्याचा मार्ग मोकळा होईल. म्हणूनच दीर्घकालाकरती राहण्याचा विचार करत असाल तर घर खरेदीचा विचार करायलाच हवा. आपल्याला चार पाच वर्षांत घर विकायचे असेल तर भाड्याने राहणे अधिक फायद्याचे राहू शकते. नव्याने घर खरेदी करताना कर्जाच्या हप्त्याच्या विचार करून चालत नाही. तर डाऊन पेमेंट, नोंदणी शुल्क, जीएसटी आदी गोष्टींसाठी देखील पैसे द्यावे लागतात. या सर्व खर्चाचे आकलन करून घर खरेदी करण्याचा निर्णय घ्यावा. ◆◆◆

डीमॅट अकाउंट ट्रान्सफर करायचयं?

चां गल्या सेवेसाठी किंवा कमी शुल्कासाठी शेअर बाजारातील व्यवहारासाठी वापरले जाणारे डीमॅट खाते दुसऱ्या डीमॅट खात्यात स्थानांतरित करू इच्छित असाल तर ही प्रक्रिया अतिशय गहजणपे पार पाडता येईल. मग ती ऑनलाइन असो किंवा ऑफलाइन, दोन्ही पर्याय सुरक्षित आहेत. ऑनलाइनवर डीमॅट खाते स्थानांतरित करण्याची प्रक्रिया वेगाने होते आणि ती सुविधाजनक आहे. शेअरचे डीमॅट खाते दुसऱ्या डीमॅट खात्यात कसे स्थानांतरित करू शकतो, हे जाणून घेऊ.

शेअर ट्रान्सफर करण्याचे दोन मार्ग आहेत. पहिला ऑनलाइन असून त्यात सीडीएसएल(cdsl)किंवा एनएसडीएल(nsdl) प्लॅटफॉर्मच्या मदतीने ट्रान्सफर करता येणे शक्य आहे. दुसरे म्हणजे ऑफलाइन किंवा मॅन्युअल. यात डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिपच्या (डीआयएस) मदतीने ट्रान्सफर करता येते.

ऑनलाइन मार्ग: तुमचे जुने आणि नवीन डीमॅट खाते दोन्हीही एकाच डिपॉझिटरी (सीडीएसएल किंवा एनएसडीएल) मध्ये असतील तर ऑनलाइन ट्रान्सफर करण्याची प्रक्रिया वेगाने होते.

सीडीएसएल प्लॅटफॉर्मने ट्रान्सफरची पद्धत:

सीडीएसएलच्या इझिएस्ट (easiest) पोर्टलवर लॉगइन करा. ज्या खात्यात शेअर ट्रान्सफर करायचय, त्याला ट्रस्टेड अकाउंट म्हणून जोडा शेअरची निवड करून ट्रान्सफर रिक्वेस्ट सबमिट करा. शेअरचे ट्रान्सफर करा तासांत किंवा पुढील कामकाजाच्या दिवसांत होतील.

एनएसडीएल स्पीड-इ प्लॅटफॉर्मने ट्रान्सफरची पद्धत :

एनएसडीएलच्या स्पीड इ प्लॅटफॉर्मवर लॉगइन करा

ज्या डिमॅट खात्यात शेअर पाठवायचे आहे, त्याची निवड करून रिक्वेस्ट सबमिट करा.

पासवर्ड आणि टोकनचा वापर करून ट्रांजेक्शनला ऑथेंटिक करा. याप्रमाणे डीमॅट खाते ट्रान्सफर होईल.

जाणून घ्या

ऑफलाइन मार्ग (डीआयएस) हा पारंपरिक मार्ग आहे आणि त्यात तुम्हाला ब्रोकरकडून डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिप मिळवावी लागते. सर्वप्रथम ब्रोकरकडून डीआयएस मिळवा. ते एखाद्या चेकबुकप्रमाणे असते.

ज्या शेअरला ट्रान्सफर करायचे आहे, त्याचे 'आयएसआयएन' आणि नवीन डीमॅट खात्याची माहिती भरा.

स्लिप तुमच्या ब्रोकरकडे जमा करा आणि तो प्रक्रिया पूर्ण करेल.

लक्षात ठेवण्यासारखे

शुल्काची तपासणी करा: ब्रोकर शेअर ट्रान्सफरसाठी शुल्क आकारू शकतो. प्रामुख्याने डीमॅट खाते 'सीडीएसएल'कडून 'एनएसडीएल'कडे किंवा 'एनएसडीएल'कडून 'सीडीएसएल'कडे असेल तर.

युआयएनची गरज: शेअरचे ट्रान्सफर हे एखाद्या निश्चित मर्यादेपेक्षा अधिक रक्कत असेल तर त्यासाठी युआएनची गरज भासते.

कर: शेअर ट्रान्सफरचा करावर देखील परिणाम होऊ शकतो. अशावेळी टॅक्स कन्सल्टंटशी चर्चा करणे गरजेचे आहे.

एकंदरीत ऑनलाइन किंवा मॅन्युअल मार्गाने शेअर ट्रान्सफर करणे सोपे आहे. डीमॅट स्थानांतरित करण्याच्या प्रक्रियेला फॉलो केले तर शेअरला कोणत्याही कटकटीशिवाय आणि अडचणीशिवाय एक खात्यातून दुसऱ्या खात्यात ट्रान्सफर करू शकतो. ◆◆◆

परवडणाऱ्या कर्जातून व्यवसाय सुरू करा

कें द्र सरकारची पीएम विश्वकर्मा योजनेची व्याप्ती वाढत असून ती फायदेशीर ठरणारी आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी हजारो गरजू उत्सुक आहेत. साधारणपणे सुमारे अडीच कोटी लोकांनी या योजनेसाठी अर्ज केला आहे. योजनेनुसार पात्र व्यक्तींना किरकोळ व्याजदरच्या आधारावर व्यवसाय करण्यासाठी कर्ज दिले जाते. या योजनेत व्याजदर किती, कोणता व्यवसाय त्यास पात्र असेल, किती कर्ज मिळेल, सदस्यत्वासाठी काय करावे लागेल, अर्जाची स्थिती या सर्व गोष्टी आपण पाहू. तुम्हीही या योजनेसाठी पात्र ठरत असाल तर त्याचा फायदा घेऊ शकता.

विश्वकर्मा योजना म्हणजे काय?

पीएम विश्वकर्मा योजनेचे पूर्ण नाव विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना असे आहे. ही योजना मागच्या वर्षी सप्टेंबर महिन्यातच सुरु झाली. या योजनेला आता एक वर्ष पूर्ण झाले आहे. आतापर्यंत मिळालेल्या आकडेवारीनुसार या योजनेसाठी सुमारे २.४५ कोटी लोकांनी अर्ज केला आहे. अर्जदाराला कमाल तीन लाखांपर्यंतचे कर्ज केवळ पाच टक्के या किरकोळ व्याजदरावर दिले जाते. हे कर्ज एक रक्कमी दिले जात नाही तर ते दोन टप्प्यांत थोडे थोडे दिले जाते. पहिल्या टप्प्यात एक लाख कर्ज दिले जाते आणि त्याची परतफेड दीड वर्षांत करायी लागते. दुसऱ्या टप्प्यात दोन लाख रुपयांचे कर्ज दिले जाते आणि त्याची परतफेड ३६ महिन्यांत करायी लागते.

कोणाला आणि कशासाठी कर्ज?

प्रामुख्याने विश्वकर्मा योजना कारागीर आणि शिल्पकारांसाठी आणली आहे. असंख्य कारागीर आणि शिल्पकारांना भांडवलाअभावी व्यवसाय सुरू करता येत नाही. त्यामुळे सरकारने या योजनेनुसार त्यांना पैसे उपलब्ध करून देण्याची घोषणा केली. कर्जाव्यतिरिक्त योजनेच्या अर्जदारांना त्यांच्या कौशल्याच आणखी व्यावसायिकता आणण्यासाठी प्रशिक्षण देखील दिले जाणार आहे. ते पूर्ण केल्यानंतर एक प्रमाणपत्र आणि ओळखपत्र दिले जाईल. प्रशिक्षण संपल्यानंतर प्रमाणपत्रावर नाही तर उपकरणे खरेदी करण्यासाठी पंधरा हजार रुपयांची रोख रक्कमही दिली जाईल. या योजनेनुसार नोंदणीची प्रकिया पूर्णपणे मोफत आहे.

योजनेस पात्र कोण असेल?

या योजनेसाठी सर्वप्रथम भारतीय नागरिक असणे गरजेचे आहे. अर्जदाराचे वय अठरापेक्षा अधिक आणि ५० पेक्षा कमी असणे गरजेचे आहे.

सरकारी सेवेत असणाऱ्या नागरिकांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. शिवाय कोणत्याही अन्य सरकारी योजनांचा लाभ घेणाऱ्या मंडळींना या योजनेत सामील होता येणार नाही. कारागीर किंवा शिल्पकारांना या योजनेसाठी अर्ज करता येईल आणि त्यात पारंपरिक खेळणी तयार करणारे कारागीर, लाकडी काम करणारे, पादत्राणे तयार करणारे, फुलविक्रेते, शिवणकाम करणारे, मासेमारीसाठी जाळे तयार करणारे, सराफा कारागीर, कुऱ्हाड तयार करणारे आदींचा समावेश आहे.

नोंदणी कशी करायी?

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अधिकृत संकेतस्थळावर जावे. तेथे नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करायी लागेल. https://pmvishwakarma.gov.in पोर्टलवर मोबाईल नंबर आणि आधार कार्ड नंबरचा उल्लेख करावा लागेल आणि त्यानंतर खाते तयार होईल. त्यानंतर एक ओटीपी मिळेल आणि त्यानुसार खातरजमा केली जाईल. यानंतर स्क्रीनवर नोंदणी अर्ज दिसेल आणि तो भरावा लागेल.

एवढ्यावरच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होत नाही. आपल्याला आयडी आणि पासवर्डचा वापर करत योजना पोर्टलवर लॉग इन करावे लागेल. तेथे गरजेनुसार योजनेची निवड करू शकता. अर्जाची पडताळणी झाल्यानंतर त्याचे स्टेटस वेळोवेळी पाहत राहा. या आधारावर अर्ज मंजूर झाला आहे की नाही, याचा मागोवा घेता येईल. स्टेटस तपासण्यासाठी अधिकृत संकेतस्थळावरच जावे लागेल. आपला अर्ज मंजूर झाला असेल तर आपल्याला आयडी कार्ड आदी गोष्टी जारी केल्या जातील. या गोष्टी डाऊनलोड करू शकता. एखादा व्यक्ती ऑफलाइन अर्ज करू इच्छित असेल तर त्यासाठी त्याला कॉमन सर्व्हिस सेंटरवर जावे लागेल. शिवाय दलालापासून सावध राहणे तितकेच गरजेचे आहे. खाते सुरू करून देतो, कर्ज मिळवून देतो यासारखे आमिष दाखवून ते लोकांकडून पैसे उकळतात. अशा व्यक्तींपासून सावध राहणे आवश्यक आहे.

मानसी जोशी

अर्जासाठी पात्रता आणि अटी

विश्वकर्मा योजनेसाठी नोंदणी करताना अर्जदाराचे वय १८ पेक्षा अधिक आणि ५० पेक्षा कमी असणे गरजेचे आहे. शिवाय अर्जदाराने मागील पाच वर्षांच्या काळात स्वयरोजगार किंवा व्यवसायासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या अन्य कोणत्याही योजनेनुसार कर्ज घेतलेले नसावे. अर्थात कर्ज भरले असेल तर या योजनेसाठी अर्ज केला येऊ शकतो. योजनेचा लाभ कुटुंबातील एका सदस्याला घेता येऊ शकेल.

कर्जावर किती व्याज?

विश्वकर्मा योजनेनुसार सरकार अर्जदारांना कर्ज उपलब्ध करून देते आणि त्याचा व्याजदर खूपच कमी म्हणजे पाच टक्के आहे. या कर्जाचा कमाल कालावधी चार वर्षांचा आहे. कर्जदार कर्ज घेताना सहा महिन्यांनंतर एखादे प्रिपेमेंट करत असेल तर तो करू शकतो. यासाठी कोणतेही आगाऊ शुल्क किंवा पेनल्टी आकारली जात नाही.

आवश्यक कागदपत्रे

योजनेनुसार आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांत आधार कार्ड, ओळखपत्र, रहिवासी पुरावा, मोबाईल नंबर, जातीचे प्रमाणपत्र, बँक खाते पासबूक, पासपोर्ट आकाराचा फोटो, मोबाईल नंबर, ईमेल आयडी आदींचा समावेश आहे. योजनेचा प्रमुख उद्देश कारागिरांचा कौशल्य विकास करणे आणि त्यांना आर्थिक मदत करणे. यासाठी तहसील आणि जिल्हा मुख्यालाय येथील लघु आणि मध्यम लघु उद्योग विभागांकडून प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. या योजनेतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या कारागिरांना आर्थिक साह्य देण्याची तरतूद आहे. ◆◆◆

'सिद्धार्थ वाणी'

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ चना चातुर्मास सावेडी मे है।

"अरे देवा ! तुला सलाम"

तीर्थंकर प्रभू आदिनाथ भगवान यांची वैविध्यपूर्ण बाग पाहून विनम्र आचार्यश्रींचे शेतातील कमळ आणि हात कमळ फुलल्यासारखे वाटते. तुम चित्ताने ते प्रभूच्या चरणी कमळ नमन करत आहरेत. प्रणवह्रूम म्हणजे आणखी काय सांगू, फक्त नमो, नमो, नमो हे भाव माझ्या ओठूत पुन्हा पुन्हा उठत आहेत. भगवंताचे सर्वव्यापी विशाल रुप पाहून आत्मा शक्तीचे सामर्थ्य समजा आचार्यश्री, तिन्ही लोकांचे दुःख दूर करणारा परमेश्वर मला सापडला आहे. शरीर आणि मन सुशोभित करणारा अद्भुत विलक्षण विभूषण मला मिळाला आहे, अशी त्यांची भावना आहे. माझा स्वामी तिन्ही लोकांचा देव आहे. जो संसार सागरात बुडणाऱ्या जीवांना वाचवतो.

प्रस्तुत श्लोकात विनयमूर्ती आचार्यश्रींनी नमस्कारांजलीसह आदरांजली वाहिली आहे. प्रेमाने भरलेल्या अंतःकरणाने मध्यमंगळाच्या रूपात भगवंताच्या चरणी, हा नमनदीप भक्तामर स्तोत्राचा पहिला भाग आणि दुसरा भाग भक्तिभावाने प्रकाशित करत आहे.

उपासनेचा उद्देश :- तीर्थंकर वितराग प्रभूंचे सर्व वेगळेपण आणि महानता आत्मसात करण्याची वचनबद्धता आहे. बंधनानेच खालच्या गोत्राचा नाश होतो आणि उच्छ्गोत्रबद्ध होते. विनयवादी मतः माणसाला समोर कोणी पाहिल्यावर तो त्याला षष्ठांगत नमस्कार करतो. मग तो कुत्रा, गाय, मांजर, देव किंवा गुरु असो, प्रत्येकजण त्याच भावनेने नतमस्तक होतो. तो भिकारी असो वा साधू असो वा सावकार असो, त्याची त्याला पर्वा नसते, पण अभिमान दूर करण्याचा योग्य मार्ग नाही. गुण-अवगुण तपासल्याशिवाय डोके टेकवून कशीही साध्य होती नाही. खरे तर अहो भावपूर्वक केलेले वंदनानेच जीवन सार्थक बनते.

तिक्खुतोच्या पठणातून गुरुची तीन वेळा हेतुपूर्वक प्रार्थना केली जाते. अनुप्रप्त प्राप्त करण्यासाठी, पुत्र रत्नत्रयराधक गुरुची पूजा केली जाते. ज्ञानदाता गुरुवर तुला नमस्कार असो. चारित्र्य प्रदान करणाऱ्या गुरुला वंदन. आम्ही रत्नत्रयाचे अभिनंदन करतो. उपासनेचे तीन प्रकार आहे- (१) 'मत्थएणवंदामि' म्हणत जघन्यपूजा करणे, (२) मध्यम वंदना विधिसहित तिक्खुतोचे पठणे करणे, (३) इच्छामि खमासमणो पठण करुन उत्कृष्ट भावनां उत्कृष्ट वंदना.

*** अहो त्रयलोक पीडा निवारक प्रभु तुम्हाला नमस्कार असो:-**

* महात्मा बुद्धांनी सांगितले :- ''दुख समुच्चयोसंसार'' सर्व संसार एकमात्र दुःखाने त्रासले आहे.

* महावारींनी सांगितले :- ''खणमित सुक्खा बहुकाल दुक्खा.''

संसारात क्षणभर सुख आहे आणि फार काळ दुःख आहे.

हे परमेश्वर! जहाजाप्रमाणे तुझ्या दोन्ही पायांसाठी आणि समुद्रात बुडणाऱ्या जीवासाठी प्रस्तुत श्लोकांमध्ये आचार्यश्रींनी भगवंतांना भावंदीचीया शोषक आणि पापे दूर करणारा असे संबोधून बरेच काही केले आहे. भगवंताच्या चरणांवर अवसलंबून असलेला भक्त सर्व पापी भावना, सर्व सांसारिक समस्या, ऋषी, तीर्थंकर, परमेश्वराचे वचन, प्रकाशाचा प्रकाश आणि परमेश्वराच्या भक्तीतून निर्माण होणारा जगाचा प्रकाश ग्रहण करतो.

नमस्कार संपूत्त प्रयोग :- नमस्कार ही उपासनेची पहिली पायरी आहे. महामंत्रांचे शुभचिंतन

*** गाथा * (२६)**

तुभ्यं नम स्त्रिभुवनातिहरांय नाथ ।
तुभ्यं नमः क्षितितलामल-भूषणाय ।
तुभ्यं नमस्त्रिजगतः परमेश्वराय,
तुभ्यं नमो जिन भवोदधि शोषणाय ।।२६।।

*** अर्थ- ***

अरे देवा! तिन्ही लोकांचे दुःख दूर करणाऱ्या तुला नमस्कार असो. हे पृथ्वीचे शुद्ध रत्न! तुला सलाम, तिन्ही जगाचा देव! तुला सलाम, अहो जिनेंद्र! सागराला कोरडे करणारा, म्हणजेच जीवांना मोड देणारा तू होवो! तुला सलाम.

"अरे. सद्गुण!"

सर्व गुणांनी युक्त आश्चा आदिनाथाला भक्तिभावाने नमस्कार केल्याने आत्माच अनंत गुणांनी संपन्न होतो. त्तत्तावियसी भक्तिपुष्प भगवान चरणी अर्पन करताना आचार्यश्रींचे कमळ ठोळे आश्चर्याने विस्फारले.

आश्चर्याचे कारण म्हणजे सांसारिक लोक आजपर्यंत असा एकही माणूस सापडला नाही की ज्याला सर्व सद्गुण आहेत आणि ज्याच्यात एकही दोष नाही, कारण ही सृष्टी गुण-दोषांनी भरलेली आहे. कोणताही संसारी माणूस सर्व सद्गुणांपासून किंवा सर्व दोषांपासून मुक्त नसतो. पण हे परमेश्वर! शोधूनही तुमच्यात एकही दोष सापडत नाही, ते तुमच्या आत पूर्णपणे असत्तियात आहे. प्रत्येक गुण आणि अनंत चतुष्टयी (अनंत ज्ञान, अनंत तत्त्वज्ञान, अनंत आनंद आणि अनंत केटाळवाणेपणा) च्या परिपूर्णतेने प्राप्त झालेले सौंदर्य आश्चर्यकारक आहे. तुझ्यासारखा महान संत सर्व गुणांनी युक्त आणि सर्वगुणसंपन्न असेल यात नवल का?

ज्याप्रमाणे सूर्याच्या प्रकाशात अंधार टिकत नाही, त्याचप्रमाणे सद्गुणांच्या अखंड आणि अनंत प्रकाशाच्या समोर दुर्गुण कसे टिकतील? ज्याप्रमाणे अंधार आणि प्रकाश एकत्र राहू शकत नाही, त्याचप्रमाणे सद्गुणांच्या अखंड आणि अनेक प्रकाशाच्या समोर दुर्गुण कसे टिकतील? ज्याप्रमाणे प्रकाश व अंधार एकत्र राहू शकत नाही, त्याचप्रमाणे जिनेश्वर देवामध्ये दुर्गुण आणि सद्गुण एकत्र राहू शकत नाही.

या श्लोकात आचार्यश्रींनी भगवंताच्या एक श्रेष्ठ गुण प्रकट झाल्यानंतर जेथे भगवंत भ्रमण करतात तेथे वाईटाचा प्रवेश नाही. अतिवृष्टी होत नाही, प्राणघातक रोगाचा उपद्रव नाही, वेदनादायक वाईट प्रवेश करू शकत नाही, अतिवृष्टी नाही, आनंददायी सुगंधी द्रवांचे अभिसरण वाढते. विश्वातील सर्वोच्च सत्य आणि सौंदर्य जे काही आहे, ते शिव, पणे, तोच परमेश्वर आहे.

आचार्यश्रींनी पहिल्या (२७) श्लोकांनंच्या अंतरिक्ष वैभवाचे तपशीलवार वर्णन केले आहे. भगवंताचा बाह्य महिमा दहा श्लोकांत मांडला आहे. या बाह्य वैभवाने देवाचा गौरव होत नाही.

पृथ्वीच्या अंतरिक्ष वैभवापलीकडे बाह्य वैभव प्राप्त होते. देवाला बाह्य वैभवापेक्षा श्रेष्ठ मानणारा विश्वासाचे अपूर्ण आहे, असे श्रीमद्राचंद्रजींनी आत्मसिद्धी शास्त्रात सांगितले.

*** अष्टमहाप्रतिहार्य संपुट** :- हे भगवान आठ महाप्रतिहार्याच्या मध्यभागी विराजमान! तुझे सौंदर्य अप्रतिम, अवर्णनीय आहे. अशोक वृक्षाचे चिंतन केल्याने माझे सर्व दुःख आणि क्लेश दूर होतात. स्फटिक सिंहासनाचे ध्यान केल्याने तुमच्या अधिपत्याखाली माझे आसन स्थिर होत आहे. विणकम करताना चन्चार माझ्यातल्या नम्र भावना व्यक्त करत आहेत. छत्रीच्या ध्यानाने माझे जीवन शुद्ध होत आहे. देव दुंदुभीचा गूढ नाद जन्म मृत्यूचे दुःख दूर करेल. सुरपुळ्याचा पाऊस माझ्यात सद्गुण निर्माण करतो. आभा माझ्या आत्माला तेजस्वी बनवत आहे. हे प्रभु, तुझा मनस्वी वाणी माझ्या आत गुंजत आहे आणि मला जन्म-मृत्यूच्या बंधनातून मुक्त करतो आहे.

अष्टमहाप्रतिहार्याच्या मध्यभागी बसलेल्या भगवंताच्या दर्शनामुळे माझ्यात आठ गुणांची वाढ होत आहे.

*** गाथा * (२७)**

को विस्मयोऽप यदि नाम गुणैरशेषैस्
त्वं संश्रितो निरवकाशतया मुनीश ।
दोषै - रुपात - विविधा - श्रय - जातगर्वैः
स्वप्नान्तरेऽपि न कदाचिद् - पीक्षितोऽसि ।।२७।।

*** अर्थ- * हेतू**

हे मुनीश्वर! सर्व सद्गुणांना तुझ्यात खोलवर आश्रय मिळाला आहे. त्यामुळे दोषांना तुमच्यात किंचितही स्थान मिळाले नाही. त्यामुळे इतर अनेक देवांमध्ये स्थान मिळवून तो गर्विष्ठ झाला आहे. तरीही तो कधी स्वप्नातही तुला भेटायला आला नाही, मग यात नवल ते काय? ज्याला इतरत्र आदर मिळतो तो आश्रय न देणाऱ्या व्यक्तीकडे का परत येईल? तुझ्यात दोषाचा मागमूसही नाही, तुम्ही तर गुणपुंज आहे.

– सौ. सविता चोरडिया

श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या वतीने

भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांचा जन्मदिन स्वरांजलीने स्वरसुगंधात साजरा

श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयच्यावतीने आयोजित भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता मंगेश यांच्या जन्मदिन स्वरांजलीने साजरा करताना विद्यालयाच्या संचालिका सौ.वर्षा चंद्रकांत पंडित व गायिका.

नगर – 'मेरी आवाजही पहचान हैं' या गीताचा साक्षात्कार असणारे व्यक्तिमत्व म्हणजे भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर होय ! तब्बल ७० वर्षे होऊन अधिक काळ लतादीदींनी आपल्या सुरेल सुरांनी माणसाचे जगणे समृद्ध केले अन्न आणि भावगीत गायनातून लतादीदींचे स्वर जगण्याला संस्कार आणि वळण देत राहिले, तर अनेकदा हताश आणि निराश झालेल्या मनांना संकटाच्या काळात लतादीदींचे स्वर उभारी देत राहिले आहेत. अवकाशामध्ये चंद्र, सूर्य, तारे जसे आहेत तसे लतादीदींचे स्वर निरंतर प्रक्षेपित आहेत. स्वरूपाने चिरकाल चिरंजीव असलेल्या या गानरसस्वतीचे स्मरण व्हावे म्हणून खास लोकाग्रहास्तव श्री गुरु माऊली संगीत विद्यालयाच्या वतीने लतादीदींच्या जयंतीनिमित्त मराठी गीतांच्या 'स्वरांजली' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख रामायणाचार्य ह. भ. प. गोरक्षनाथ दुतारे महाराज, उद्योजक राजेंद्र चोपडा, दिलीप अकोलकर, भारत भारतीचे कमलेश भंडारी, के.के.शेट्टी, अशोक गांधी-जखिवाला, पद्मावर वांजळे, किरण कोलते, डॉ. काशिद, विकी मुल्था, अमोल सुरसे, धनेश बोगावत, विलास बडवे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून नटराज मूर्ती व स्वरसाम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

विद्यालयाच्या संचालिका सौ. वर्षा चंद्रकांत पंडित यांनी गायलेल्या 'गजानना श्री गणराया आधी वंदू तुज मोरया' या गाण्यावर विद्यालयाच्या भरतनाट्यमच्या विद्यार्थीनींनी अप्रतिम नृत्याविष्कार सादर करून कार्यक्रमाची सुरुवात केली. गायनाच्या या सुरेल मैफीलीत गजानना श्री गणराया, अवाचिता परिमळू, रुणुझुणू, मोगरा फुलला, अरे अरे ज्ञाना झालासी पावन, चाफा बोलेना, मेंदीच्या पानावर, मधू मागसी, या चिमण्यांनो, संधिकाली या अशा, सुन्या सुन्या मैफिलीत, मी रात टाकली, वारा गाई गाणे, माजे राणी माजे मोगा, मथ इथले, दे मला ये चांद्रिके, बाई बाई मनामोरांचा, राजाच्या रांगण्हाली, माळ्याच्या मळ्यामंदी, ऐरणीच्या देवा, चिंब पावसाने, राजसा जवळी, मी डोलकर, ने मजसी ने परत, पसायदान आदी अविट अशी एकाहून एक सरस गाणी सादर झाली. मध्यंतरानंतर झुलतो बाई रास झुला या गाण्यावर विद्यालयाच्या विद्यार्थीनींनी पुन्हा एकदा नृत्याविष्कार सादर केला. सुंदर गायन, नृत्य या बरोबरच वादकांच्या उत्तम वादनाहीही भर पडली संगीताच्या तीनही बाजू समर्थ पणे सादर झाल्या. त्यामुळे कार्यक्रम अतिशय श्रवणीय तसेच प्रेक्षणीयही ठरला व सर्व रसिक प्रेक्षक मंत्रमुग्ध होऊन या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचा आनंद घेत राहिले.

या मैफिलीत प्रमुख गायीका गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या संचालिका नृत्य तपस्वी वर्षा पंडित यांच्या सह डॉ. नीरज कंदीकर, मिलिंद कोलते, माधवी ऋषी, अमृता बेडेकर, ऋतुजा पाठक, गौरी बिडकर, अनघा रासने यांनी गायलेल्या गीतांनी रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यांनी तबला आणि ढोलकीवर अजित गुंदेचा, बासरीवर पुण्याचे सचिन वाघमारे, सिंथेसायझरवर सत्यजित सराफ, अटपेर्पेडवर निलेश सोज्वळ यांनी उत्तम साथसंगत केली. तर आस्था पिंगळीकर, आर्या दहिफळे, किया सरोवेर, चैत्राली क्षीरसागर, गौरी साठवे, सृष्टी गोधे, धनश्री पवार, राजेश्वरी खडके, अनन्या तुंगार, मुग्धा देवळके, पूर्वा म्याना या विद्यार्थी कलाकारांनी नृत्य सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली.

लता मंगेशकर यांच्या जन्म दिनाचे औचित्य साधून नगरसभील संगीत क्षेत्रातील महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या थोर विदुषीं, संगीतज्ञ श्रीमती आशाताई देशपांडे तसेच गीतकार व नाट्य लेखिका मंगल पाठक व नगर मधील पहिल्या सतार वादिका स्मिता राणा यांना राजेंद्र चोपडा, दिलीप अकोलकर यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. त्यावेळी आशाताई देशपांडे यांनी आता विसाव्याने क्षण व गीत नको नाऊ पाखरा या अवीट गोडीच्या हृदयस्पर्शी गाण्यांच्या काही ओळी गाऊन प्रेक्षकांची मने जिंकली.

मंगलताई पाठक यांनी मनोगतात हा सन्मान माझ्या एकटीचा नसून माझ्या संपूर्ण कुटुंबाचा आहे असे नमिताताई म्हणाल्या.

तसेच स्मिता राणा यांनी त्यांच्या अनेक गुरूंचा उल्लेख करून सर्वांचे ऋण व्यक्त केले.

कार्यक्रमाचे निवेदन वर्षा पाठक – रोडे यांनी केले.

लतादीदींच्या स्मरणार्थ होणाऱ्या याही कार्यक्रमासाठी समगृहाच्या प्रवेश द्वारात दिनेश मंजरतकर यांनी लतादीदींच्या प्रतिमेची सुंदर रांगोळी रेखाटली होती. रेडिओ सीटीचे आर जे प्रसन्न यांनी आभार मानले. कार्यक्रमाची सांगता करताना स्टेजवरील सर्वांनी लतादीदींना पसायदान गाऊन स्वरांजली अर्पण केली.

या कार्यक्रमास मिलिंद कुलकर्णी, हेमंत मिरिकर, अनिरुद्ध मिरीकर, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ.सुधा कांकरिया, शरद गोखले, नंदकिशोर आढाव, मिलिंद ऋषी, प्रसाद बेडेकर, संजय हिंगणे, आनंद ऋषी, अनघा ऋषी, कैलास बेरड, पवन नाईक, सुधाकर शिंदे यांचे सह अनेक संगीतप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यामागे अनेकांचे हात असतात व त्या सर्वांचे मी मनापासून आभार व्यक्त करतो व क्षेत्रातील तज्ज्ञ व सर्व स्तरातील अनुभवी लोकांकडून कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुंदर प्रतिक्रिया येत आहेत त्याबद्दल आभार व्यक्त करताना असेच लोकांच्या आवडीचे उत्तमोत्तम कार्यक्रम विद्यालयामार्फत पुढेही करत राहू, असे प्रतिपादन विद्यालयाचे सहसंचालक चंद्रकांत पंडित यांनी केले.

शिक्षक कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू होण्यासाठी तो शासन निर्णय निर्गमित करा

शिक्षक, शिक्षकेतरांना जुनी पेन्शनपासून वंचित ठेऊन दुजाभाव : बाबासाहेब बोडखे

नगर – १ नोव्हेंबर २००५ पूर्वी पदभरती जाहिरात निर्गमित झालेल्या प्रकरणी शाळेच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष तथा माजी शिक्षक आमदार नाणी गाणार यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षण सचिव व शिक्षण मंत्री यांना निवेदन पाठविले असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे शहर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग व ग्राम विकास विभाग द्वारा निर्गमित शासन निर्णय अन्वये १ नोव्हेंबर २००५ पूर्वी पदभरती जाहिरात, अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत १ नोव्हेंबर २००५ पूर्वी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी, कर्मचारी व जिल्हा परिषदमधील सर्व कर्मचारी यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आली. परंतु याची सेवा महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील तरतुदीच्या आधीन आहे. त्या शिक्षक कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला नाही, ही बाब भेदभाव करणारी व शिक्षण क्षेत्रात असंतोष निर्माण करणारी असल्याचा आरोप संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे.

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी पदभरती जाहिरात निर्गमित झालेल्या प्रकरणी १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करुन अन्याय दूर करुन दुजाभाव संपुष्टात आणण्याची मागणी शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे.

वित्त विभाग व ग्राम विकास विभाग द्वारा निर्गमित शासन निर्णयान्वये १ नोव्हेंबर २००५ पूर्वी पदभरती जाहिरात, अधिसूचना निर्गमित शासकीय अधिकारी, कर्मचारी व जिल्हा परिषदमधील सर्व कर्मचारी यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा आदेश आहे. मात्र या लाभापासून शिक्षक, शिक्षकेतरांना वंचित ठेवण्यात आले आहे. ही बाब शिक्षक, शिक्षकेतरांवर अन्यायकारक व दुजाभाव करणारी असून, तात्काळ जुनी पेन्शनचा लाभ मिळण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करणे आवश्यक आहे, असे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे शहर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी सांगितले.

घोषणावाक्य व लोगो बनविणे स्पर्धेत निकिता शिंदे द्वितीय

नगर – येथील अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीची विद्यार्थिनी निकिता शिंदे हिने डॉ. राजेंद्र गोडे फार्मसी संस्था अमरावती यांनी आयोजित केलेल्या जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त घोषणावाक्य आणि लोगो बनवण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावत रोख पारितोषिक जिंकले.

या स्पर्धेसाठी संस्थेचे प्राचार्य डॉ. योगेश बापना, प्रा. आबुती पवार, प्रा. प्रतीक्षा गांधी, प्रा. वृषाली गायकवाड, प्रा. शीतल खंडाळे व प्रा. रुचिता पवार यांचे विद्यार्थिनींना मार्गदर्शन लाभले.

ट्रॅव्हल्स बस-कारचा भीषण अपघात; दोन वर्षीय बालिका जागीच ठार

नगर – पाथर्डी तालुक्यातील कल्याण निर्मळ राष्ट्रीय महामार्गावरील करंजी गावाजवळ रविवारी (दि.६ ऑक्टोबर) पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास ट्रॅव्हल्स बस आणि कार यांची समोरासमोर धडक झाल्याने या अपघातामध्ये कारमधील दोन वर्षांची मुलगी जागीच ठार झाली. तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.

याबाबत करंजी पोलीस चौकीचे हवालदार भगवान टकले व महामार्ग पोलीस विभागाने दिलेल्या माहितीवरुन रविवारी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास पाथर्डीकडून नगरकडे जात असलेल्या वॅग्नर कारला नगरकडून पाथर्डीकडे येत असलेल्या ट्रॅव्हल बसची जोराची धडक बसल्याने या अपघातामध्ये शुभांगी अभिजीत शिरसाठ (रा. पाईपलाईन रोड, अहिल्यानगर) या दोन वर्ष वयाच्या मुलीचा जागीच मृत्यू झाला आहे. तर इतर तीनजण गंभीर जखमी झाले आहेत.

या अपघाताची माहिती समजल्यानंतर करंजी पोलीस चौकीचे अंमलदार टकले, तसेच पोलीस महामार्ग विभागाचे अधिकारी कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेऊन इतर जखमींना तात्काळ नगरला पुढील उपचारासाठी दवाखाने. महामार्गावर घडलेल्या अपघातामुळे मोहटादेवी दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसह वाहनांची दोन्ही मार्गी अपघातस्थळी झाली. त्यामुळे काही वेळ महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती.

पोलीस प्रशासनाने अपघातानंतर काही वेळातच दोन्ही अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या बाजूला केल्याने वाहतूक पुन्हा एकदा सुरळीत सुरू झाली.

मिठाईच्या दुकानातून चोरी; साहित्य व रोख रक्कम लंपास

नगर – केडगाव उपनगरातील अर्चना हॉटेल जवळील व्यावसायिकाच्या मिठाईच्या दुकानातील साहित्य व रोख रक्कम असा १३ हजार ४०० रूपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला आहे. सदरची घटना ३० सप्टेंबर रोजी दुपारी दोन ते अडीचच्या दरम्यान घडली असून या प्रकरणी शनिवारी (दि.५) दुपारी कोतवाली पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत सुंदरान खेमाराम चौधरी (वय २६ हल्ली रा. अर्चना हॉटेल जवळ, अहिल्यानगर, मुळ रा. सालवाकड़ा, जोधपुर, राजस्थान) यांनी फिर्यादि दिली आहे. फिर्यादी यांचे जिलेबीचे दुकान असून त्यांनी अर्चना हॉटेल जवळ दुकानातील साहित्य ठेवले होते. चोरट्याने तेथून गॅस टाकी, शेगडी, भांडे, वजनकाटा, साखरेची गोणी आदी साहित्यांसह ८ हजार ४०० रूपयांची रोकड चोरून नेली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तपास पोलीस अंमलदार विक्रम वाघमारे करत आहेत.

शेअर मार्केटमुळे झालेले कर्ज मिटविण्यासाठी घरफोड्या करणारा पकडला

केडगावमधील २ गुन्हे उघडकीस; राज्यभरात अनेक ठिकाणी केल्या घरफोड्या

शेअर मार्केटमुळे झालेले कर्ज मिटविण्यासाठी घरफोड्या करणारा उच्चशिक्षित तरूण चोरट्याला पकडल्यावर त्याच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

नगर – शेअर मार्केट मध्ये गुंतवणुकीत नुकसान झाल्यामुळे झालेले कर्ज मिटविण्यासाठी उच्चशिक्षित तरूण भरदिवसा बंद फ्लॅट फोडून घोऱ्या करत असल्याचा प्रकार कोतवाली पोलिसांच्या तपासातून निष्पन्न झाला आहे. त्याला अटक करण्यात आली असून त्याने नगर शहरासह पुणे, नाशिक, पालघर, कोल्हापुर जिल्ह्यात चोऱ्या केल्या असल्याचे समोर आले आहे. प्रज्वल गणेश वानखेडे (रा. टी. व्ही. सेंटर, हडको, श्रीकृष्णनगर जि. छत्रपती संभाजीनगर) असे त्याचे नाव आहे.

दरम्यान, केडगाव उपनगरात केलेल्या घरफोड्यातील सोन्याचे दागिने व गुन्हात वापरलेली दुचाकी असा पाच लाखांचा मुद्देमाल त्याच्या ताब्यातून हस्तगत करण्यात आला आहे. ११ एप्रिल २०२३ रोजी केडगाव उपनगरातील मोतीनगरमध्ये बंद घरफोडून सोन्याचे दागिने व रोकड भरदिवसा चोरून नेली होती. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. सदर गुन्ह्याचा तांत्रिक तपास केला असता. प्रज्वल गणेश वानखेडे याचे नाव निष्पन्न झाले. मात्र तो उच्च शिक्षित असल्याने फोनचा वापर तांत्रिकरित्या करत होता. आपले वास्तव्याचे ठिकाण पुणे, नाशिक, पालघर, कोल्हापूर असे बदलत होता. त्यामुळे त्याला अटक करणे पोलिसांसमोर आव्हान होते.

त्यानंतर पुन्हा २ जानेवारी २०२४ रोजी केडगाव उपनगरातील साई गॅलेक्सी अपार्टमेंटमध्ये घरफोडीची घटना घडली होती. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्हाचा तपास पोलीस करत असताना तो गुन्हा देखील प्रज्वल वानखेडे याने केला असल्याचे निष्पन्न झाले. यामुळे कोतवाली पोलिसांचे गुन्हे शोध पथक प्रज्वलच्या मागावर होते. तो छत्रपती संभाजीनगर येथील चितेगाव एमआयडीसीमध्ये आला असल्याची माहिती पोलिसांना ४ ऑक्टोबर रोजी मिळाली होती. गुन्हे शोध पथकाने तात्काळ चितेगाव एम आयडीसी गाठून प्रज्वलला ताब्यात घेतले. त्याच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंघाने चौकशी केली असता सदरचे गुन्हे शेअर मार्केटमध्ये पैसे हरल्याने, कर्ज बाजारी झाल्याने कर्ज मिटविण्यासाठी केले असल्याची कबूली दिली. तसेच त्याने पुणे, नाशिक, पालघर, कोल्हापुर येथे दिवसा घरफोडी केल्याची कबूली दिली आहे.

सदरची कामगिरी पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक योगिता कोकाटे, विकास काळे, उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, गुन्हे शोध पथकाचे अंमलदार योगेश गिमांरादिवे, गणेश धोत्रे, विशाल दळवी, सलीम शेख, संदीप पिठले, विक्रम वाघमारे, सुर्यकांत डाके, मोहन भेटे, नवूल तिरसे, विजय काळे, अभय कदम, अमोल गाढे, सतिष शिंदे, अतुल कळकळे, हंडाळ, संदीप थोरात, वर्षा पंडीत, सोनल भागवत, राहुल गुंड्डू यांच्या पथकाने केली आहे.

नगर शहर परिसरातून २ अल्पवयीन मुलींचं अपहरण

एमआयडीसी व कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल

नगर – नगर शहरासह जिल्ह्यातून अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवून नेण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढतच असून अशाच आणखी २ घटना समोर आल्या आहेत. नगर शहर परिसरातून २ अल्पवयीन शाळकरी मुलींना अज्ञात व्यक्तीनी पळवून नेले आहे. एमआयडीसी परिसरातून एका १४ वर्षीय शाळकरी मुलीला तर केडगाव उपनगरात देवी मंदिर परिसरातून एका १३ वर्ष ११ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेण्यात आले आहे. या प्रकरणी एमआयडीसी व कोतवाली पोलिस ठाण्यात २ स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

एमआयडीसी परिसरातून अल्पवयीन मुलीला राहत्या घरुन अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची घटना ३० सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ ते ७ च्या दरम्यान घडली. सदरचा प्रकार तिच्या कुटुंबियांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी मुलीचा सर्वत्र शोध घेतला परंतु ती मिळून आली नाही. अखेर पीडित अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी शनिवारी (दि.५) एमआयडीसी पोलिसांना माहिती देत फिर्यादि दिली. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक परदेशी करत आहेत.

केडगाव उपनगरातील शास्त्रीनगर परिसरातील घटना शनिवारी (दि.५) सायंकाळी ७.४० च्या सुमारास घडली. तेथून एका १३ वर्ष ११ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेण्यात आले. सदरचा प्रकार तिच्या कुटुंबियांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी मुलीचा सर्वत्र शोध घेतला परंतु ती मिळून आली नाही. अखेर पीडित अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी रविवारी (दि.६) कोतवाली पोलिसांना माहिती देत फिर्यादि दिली.

या फिर्यादीवरुन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

शेडसह जागा भाड्याने देणे आहे
नगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर हॉटेल इंद्रायणी समोर, तपोवन रोड टच कॉर्नर वरील ६ हजार आणि ४ हजार स्क्वे.फूट शेड, सर्व बाजूंनी कंपाउंड असलेली जागा भाड्याने देणे.
9689960244

2BHK भाड्याने देणे
1100 स्क्वे.फुट. पहिला मजला आगरकर मळा, स्टेशन रोड येथे
9226281830

नवीपेठेत
त्वरित जागा भाड्याने देणे
अक्षता साडी शेजारी ८०० स्क्वे.फू. जागा भाड्याने देणे आहे.
95610 11196

धनश्री उद्योग
सरकारमान्य संस्था
घरातून काम करा व रोज कमवा 500 ते 1000 रु.
बाराही महीने विविध पॅकिंगचे व्यवसाय करा.
मास ट्रेनी घरपोहोच
अंबर प्लाझा वेलहॉट, नारी मेडिकलच्या खाली, माळीवाडा एस.टी. स्टॅण्ड समोर, अ.नगर.
7066575497

आता वजन कमी करणे किंवा वाढवणे झाले सोपे
तुमच्या घरातून दररोज व्यायाम करा. वासाठी मोफत मार्गदर्शन.
अंबादास इंगळे
Ex Army Fitness Expert
मो. 8888352220
8888362220

वेल्डर पाहिजे
फॅब्रिकेशनच्या वेल्डिंग कामासाठी अनुभवी कारागिर व वेल्डर पाहिजेत
संपर्क:- 9604535327

पाहिजेत
* साऊथ इंडियन कुक/असिस्टंट
* रिसेप्शनिस्ट -१ (मेल/अनुभवी)
HOTEL अन्न
टिळकरोड, स्पर्धेच्या चौक, अ.नगर
9421099222
9422222020

WANTED Graphic Designer
With complete knowledge of
- Coral Draw
- Photo Shop
- illustrator
- Printing File

Kasdap health care Pvt Ltd
9890456789

चालू स्थितीतील प्यू.व्हेज हॉटेल हायवेटच सपूर्ण सेटअपसह भाडेतत्वावर देणे
पांढरीपुला जवळ, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर
7038477393 | 9404971528

हॉटेल सामान विकणे आहे
हॉटेल टपरी, टेबल, खुर्च्या, हॉटेलचे सर्व भांडे भट्ट्यासह विकणे
9226303030
9508808080

१३०० स्क्वे.फू. गाळा भाड्याने देणे
मार्केटयार्ड येथे सर्वसोयींनीयुक्त पहिल्या मजल्यावर १३०० स्क्वे. फूट गाळा, पतसंस्था, ऑफिसेस, दवाखाना, क्लासासाठी भाडेतत्वावर देणे आहे.
9890398098

आता पुर्णवेळ नेत्रसेवेसाठी आम्ही सज्ज झालो आहोत.
सोमवार दिनांक 23/09/2024 पासुन
पाईपलाईन रोड अहमदनगर
ओपीडी वेळ
सकाळी 11 ते रात्री 8 वाजेपर्यंत
रविवारी ओपीडी बंद राहील.
जैन हॉस्पिटल फेकोटाण्ड संचालित आनंदऋषिजी हॉस्पिटल व संशोधन विभाग पीएम अंतर्गत
आनंदऋषिजी नेत्रालय
महावीर भवन, आनंदऋषिजी हॉस्पिटल जवळ, आनंदऋषिजी मार्ग, अहमदनगर
0241-2470400 / 2320400 / 8686401515
पाईपलाईन रोड शाखा -
कन्हैय्या अपार्टमेंट, हॉटेल अतिथी शेजारी, शुभांत मेडिकल समोर, पाईपलाईन रोड, सावेडी अहमदनगर 414003 8686301515

WALK - IN INTERVIEW
SALES EXECUTIVE
Bsc. Agri. / Mech. Engineer / MBA,
Candidate should have experience, will be prefered.
Please Walk -in Interview on Wednesday- 9th Oct.& Thursday 10th Oct.2024 between 12pm to 5pm alongwith Resume & Passport Size Photograph.
SHAH BROTHERS
8855065001
shahbrothers462@gmail.com

मुले पाहिजेत
जेन्ट्स् रेडीमेड कापड दुकानात कामासाठी
श्रीयश फॅशन
बागडपट्टी रोड, अ. नगर
9890913382

पाहिजेत
शासनमान्य शाळा व कॉलेजसाठी खालील प्रमाणे जागा त्वरित भरणे आहेत.

शिक्षक	डी.एड/बी.एड.	जागा : ०६
एम.एस.सी.	फिजीक्स / केमेस्ट्री	जागा : ०३
लॅब टेक्नीशियन	B.Sc., D.M.L.T/P.G.D.M.L.T.	जागा : ०३
एक्स-रे टेक्नीशियन	B.Sc., X-Ray Tech. / Dip. Radiology Tech.	जागा : ०२
फिजीओथेरपीस्ट	Dip. in Physiotherapy / Bachelor in Physiotherapy	जागा : ०३
डॉक्टर	MBBS / BAMS / BHMS / BUMS	जागा : ०३
रिसेप्शनिस्ट	12th / Any Graduate (Comp.,Know. is must)	जागा : ०२
क्लार्क	Any Graduate (Comp.,Know. is must)	जागा : ०३
मार्केटींग ऑफिसर	MBA / MSW / Any Graduate	जागा : ०३

इच्छुकांनी संपूर्ण माहिती व अर्जासह व दिवसात समक्ष भेटावे किंवा खालील ई-मेलवर अर्ज पाठवावेत.
जीवनज्योत इंग्लिश मिडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज
बांबे बेकर्स समोर, वन विभाग कार्यालय मागे, नगर-औरंगाबाद रोड, अहिल्यानगर
Mo. 8830685732 | Email : jjmf@rediffmail.com

पाहिजेत
पॅकिंगसाठी : २ (लेडीज)
मुले : २
- अर्जासह समक्ष भेटा -
गुरु फुड्स्
कोहिनूर प्लाझा, पत्रकार चौक, लोकमत भवन शेजारी, अ.नगर

अरिहंत एन्टरप्राईजेस
* शुध्द देवपुजा तुप- २५० रू.
* फरसाण- १२० रू.
* खाकरा- १५० रू.
जुना कापडबाजार, रुग ताईट शेजारी, अ.नगर
9766636068

पाहिजेत
सेल्स कन्सल्टंट
पुरुष / महिला जागा - ४
- किमान १२वी पास (वय: २१ - ३५)
- किमान २-३ वर्ष ऑटोमोबाईल क्षेत्रात
- सेल्स मध्ये कामाचा अनुभव आवश्यक
- दुचाकी लायसन्स अनिवार्य
- उत्कृष्ट गमार व इन्सेंटिव्ह
WE ARE Hiring! JOIN OUR TEAM
सोमवार-शुक्र मुलाखती पुढील ६ दिवसासाठी, सकाळी 10 ते दुपारी 1:30 पर्यंत सुरू आहेत.
एथर स्पेस एक्सपरिथियन्स सेंटर, अहमदनगर
फक्त फिल्ड वरील किंवा जवळ, नगर-नुतन रोड, अहमदनगर
आपला CV पाठवा करा saleshead@ather-hkev.in
किंवा व्हाटसॲप करा: 9922 436876
ATHER

पाहिजेत
पॅकिंगसाठी : २ (लेडीज)
मुले : २
- अर्जासह समक्ष भेटा -
गुरु फुड्स्
कोहिनूर प्लाझा, पत्रकार चौक, लोकमत भवन शेजारी, अ.नगर

बाळ आजारी आहे का?
- ते वारंवार आजारी असणे
- वारंवार होणारा बाल दमा
- प्रतिकारशक्ती कमी असणे
- नेहमी सर्दी, खोकला
- वारंवार जुलाब होणे
- वजन, उंची कमी

या तक्रारीवर खात्रीशीर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबिर
*सर्व आजारांसाठी एंडमिट सुविधा उपलब्ध.
*सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
संपर्क : मो. ९५१११११०४४४
डॉ.अनिरुद्ध गिते MBBS / MD paeds
अक्षय मुलांचे हॉस्पिटल बालिकाश्रम रोड, अ.नगर

शॉप विकणे
फर्निचरसह, मोबाईल दुकानासाठी उपयुक्त रोडटच गाळा नं-२
हिंद अपार्टमेंट, राघवेंद्र स्वामी कमान, बोल्हेगाव फाटा, अ.नगर
9226303030
9508808080

संपूर्ण फ्रेश स्टॉक
महावीर मॉल...
मुलांचे पेपर संपले की लगेच खरेदीला या..
फॅन्सी रेडिमेड व गिफ्ट देण्यासाठी गिफ्ट पॅक
रेमंड शुटिंग ४५०/- रु मीटर
सियाराम पॅन्ट पीस शर्ट पीस जोडी ३९९/- रु. ते ५९९/- रु फक्त.
बेडशीट डबल बेड कॉटन ३९९/-रुपयात
चंद्रकोर साडी ४४९/- रुपयात
मार्केट पेक्षा वेगळ पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी याचे लागेल.
अधिक माहीतीसाठी भेट द्या.
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

जाहीर नोटीस
या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणे येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक १. प्रेरणा साहेब स्नेहीत २. नरसीमा साहेब प्रेरणा ग. पुत्र नुतन नगर, कडा, ता आष्टी, जि सिंध आज मु अहमदनगर यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर मिळकत विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमचुच खरेदी देण्याचे ठरविले असुन विसारापोटी रक्कम देखील स्वीकारलेली आहे. तसेच सदर मिळकत ही निर्बंध निजीखाली व बोजारहीत, असल्याची विक्षास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.
या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, भगाई, दावा, लिज, गहाण, बक्षिस, चोरती हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन १७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्तावर संपूर्ण कागदोपत्री पुरव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे आपर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.
परिशिष्ट
मिळकतीचे वर्णन - जिल्हा पुणेही अहमदनगर पो. तु. ता. नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे नागरदेवळे येथील भू.नि.क्रमांक साहेब, अहमदनगर यांचे कब्जीत प्लॉट व त्यावरील बांधकामासह मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.
अ) स.नं. प्लॉट नं. चौ.मी.
२४२/१ १८५ १४५.७५
विद्यमान मालक नं. १ यांच्या संपूर्ण मालकीच्या पूर्वेकडील बाजुचा रो- बंगलो युनिट नं. १ चे प्लॉट क्षेत्र ८७.८८ चौ.मी. अधुन सदर प्लॉटवर आर. सी. सी. पध्दतीचे बांधकाम झालेले असून, तळ मजल्यावरील बांधकाम क्षेत्र ४३.८७५ चौ. मी. व पहिल्या मजल्यावरील बांधकाम क्षेत्र ४३.८७५ चौ. मी. असी एकुण बांधकाम क्षेत्र ८७.७५ चौ. मी. बांधकामासह मिळकतीबाबत.
सांगी चतुःसिमा :
पुर्वेस - प्लॉट नं.१८६, दक्षिणेस - प्लॉट नं. १८२
पश्चिमेस - प्लॉट नं.१८५ पैकी युनिट नं. २ उत्तरेस - ६ मीटर रस्ता
ब) स.नं. प्लॉट नं. चौ.मी.
२४२/१ १८५ १४५.७५
विद्यमान मालक नं. २ यांच्या संपूर्ण मालकीच्या बाजुचा रो- बंगलो युनिट नं. २ चे प्लॉट क्षेत्र ८७.८७ चौ.मी. अधुन सदर प्लॉटवर आर. सी. सी. पध्दतीचे बांधकाम झालेले अधुन, तळ मजल्यावरील बांधकाम क्षेत्र ४३.८७५ चौ. मी. व पहिल्या मजल्यावरील बांधकाम क्षेत्र ४३.८७५ चौ. मी. असी एकुण बांधकाम क्षेत्र ८७.७५ चौ. मी. बांधकामासह मिळकतीबाबत.
सांगी चतुःसिमा :
पुर्वेस - प्लॉट नं.१८५ पैकी युनिट नं. १ दक्षिणेस - प्लॉट नं. १८२
पश्चिमेस - प्लॉट नं.१८४, उत्तरेस - ६ मीटर रस्ता
वेगेघ्रमणे चतुःसिमापुर्वक कच्ची एक साखुन न देविता
दि. ०७/१०/२०२४.
अहमदनगर.
अॅड. नाजिम अहमद इन्माईल शेख
अॅड. कुरेशी फैजान फारुक
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८५४३५९८० / ७२७६२५२७४८

जाहीर नोटीस
या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणे येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकतीची विद्यमान मालक दिलीप काशमीरी भोसले. रा. सुर्योमनर तपोवन मार्ग, औरंगाबाद रोड, सावेडी, अहमदनगर. यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन विद्यमान मालक यांनी सदर प्लॉट व त्यावरील बांधकामासह मिळकत आमचे अशिलांस कायमचुच खरेदी देण्याचे ठरले आहे. विसारापोटी रक्कम देखील घेतलेली आहे. तसेच सदर मिळकत ही निर्बंध निजीखाली व बोजारहीत,असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.
या उपरही सदर प्लॉट मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, भगाई,दावा,लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान, बक्षिस, चोरती हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन १७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्तावर संपूर्ण कागदोपत्री पुरव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे आपर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.
परिशिष्ट
मिळकत वर्णन - वि. अहमदनगर सब. डि. ता. नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील ३१४६३ येथील प्लॉट व त्यावरील बांधकामासह मिळकत वर्णन खालील प्रमाणे.

स.नं.	प्लॉट नं.	चौ.मी.
६५/१अ /६६/१	७९	२६०.००

या पैकी विद्यमान मालक यांच्या मालकीच्या उत्तरेकडील बाजुचा संपूर्ण प्लॉट त्याचे क्षेत्र १५०.०० चौ.मी. यावर सोडवेकडील गाळे बांधकाम झालेले अधुन बांधकाम क्षेत्र ४५.९२ चौ.मी. तसेच यातील इलेक्ट्रीक लाईट मीटर व पाण्याचे नळ कनेक्शनसह आहे त्या परिस्थीत संपुर्ण बांधकामासह मिळकतीबाबत.
सांगी चतुःसिमा :
पुर्वेस - १२.०० मी.रस्ता दक्षिणेस - प्लॉट नं. ७५ पैकी
पश्चिमेस - स.नं. पैकी उत्तरेस - प्लॉट नं. ८०
वेगेघ्रमणे चतुः समापुर्वक काही एक साखुन न देविता
दि. ०७/१०/२०२४
अहमदनगर
अॅड. नाजिम अहमद इन्माईल शेख
अॅड. कुरेशी फैजान फारुक
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८५४३५९८० / ७२७६२५२७४८

१२/२४ तास लहान बाळ सांभाळण्यासाठी मुलगी/बाई पाहिजे
(वयोमर्यादा १८ ते ४०) | संपर्क : 8888576576

जाहीर नोटीस
या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणे येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली जमीनीचे विद्यमान मालक १) अमाज इकबाल सय्यद अ. रहमान, क्षेत्र दोघेही स. १६१२ / २, क्षेत्र नही, डीडीसेट, अहमदनगर यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर जमीनीचे विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमचुच खरेदी देण्याचे ठरुन आमच्या अशिलाकडून विसारापोटी रक्कम घेतलेलेली आहे. तसेच सदर जमीन मिळकत ही निर्बंध निजीखाली असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.
या उपरही सदर जमीन मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, भगाई, दावा, लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान, बक्षिस, चोरती हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन १७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्तावर संपूर्ण कागदोपत्री पुरव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे आपर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.
परिशिष्ट
मिळकत वर्णन - जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, अहमदनगर जिल्हापरिषद हद्दीतील मौजे मारोडी पारुमाव येथील खालील बर्मनाची मिळकत -

ग.नं.	हे. आर.	रु. पै.
१९९	४.३८	५.००
पोख ०.२७		
४.६५		

यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीची पुर्वेकुन दक्षिण बाजूकडील संपूर्ण हे ५४ आर + पोख ० हे ०५ आर असे एकुण ०१ हे ०० आर (अडीच एकर) या मधील बोअरवरुन जमीन मिळकत बाबत.
सांगी चतुःसिमा :
पुर्वेस - गावठाणतील अंतर्गत रस्ता दक्षिणेस - गट नं. १९५
पश्चिमेस - गट नं. १९९ पैकी उत्तरेस - गट नं. १९९ पैकी
वेगेघ्रमणे चतुः समापुर्वक काही एक साखुन न देविता
दि. ०७/१०/२०२४
अहमदनगर
अॅड. नाजिम अहमद इन्माईल शेख
अॅड. कुरेशी फैजान फारुक
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८५४३५९८० / ७२७६२५२७४८

जाहीर नोटीस
या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणे येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक १. प्रेरणा साहेब स्नेहीत २. नरसीमा साहेब प्रेरणा ग. पुत्र नुतन नगर, कडा, ता आष्टी, जि सिंध आज मु अहमदनगर यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर प्लॉट व त्यावरील बांधकामासह मिळकत आमचे अशिलांस कायमचुच खरेदी देण्याचे ठरले आहे. विसारापोटी रक्कम देखील घेतलेली आहे. तसेच सदर मिळकत ही निर्बंध निजीखाली व बोजारहीत,असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.
या उपरही सदर प्लॉट मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, भगाई,दावा,लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान, बक्षिस, चोरती हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन १७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्तावर संपूर्ण कागदोपत्री पुरव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे आपर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.
परिशिष्ट
मिळकत वर्णन - वि. अहमदनगर सब. डि. ता. नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील ३१४६३ येथील प्लॉट व त्यावरील बांधकामासह मिळकत वर्णन खालील प्रमाणे.

स.नं.	प्लॉट नं.	चौ.मी.
६५/१अ /६६/१	७९	२६०.००

या पैकी विद्यमान मालक यांच्या मालकीचा उत्तरेकडील बाजुचा संपूर्ण प्लॉट त्याचे क्षेत्र १५०.०० चौ.मी. यावर सोडवेकडील गाळे बांधकाम झालेले अधुन बांधकाम क्षेत्र ४५.९२ चौ.मी. तसेच यातील इलेक्ट्रीक लाईट मीटर व पाण्याचे नळ कनेक्शनसह आहे त्या परिस्थीत संपुर्ण बांधकामासह मिळकतीबाबत.
सांगी चतुःसिमा :
पुर्वेस - १२.०० मी.रस्ता दक्षिणेस - प्लॉट नं. ७५ पैकी
पश्चिमेस - स.नं. पैकी उत्तरेस - प्लॉट नं. ८०
वेगेघ्रमणे चतुः समापुर्वक काही एक साखुन न देविता
दि. ०७/१०/२०२४
अहमदनगर
अॅड. नाजिम अहमद इन्माईल शेख
अॅड. कुरेशी फैजान फारुक
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८५४३५९८० / ७२७६२५२७४८

DISHA COMPUTER INSTITUTE
An ISO 9001:2015 Certified
Experts In Computer Training
MAHA DISCOUNT offer
Just in 1800 Any Course
JOIN TODAY
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY PRIME, PHOTOSHOP, CORELDRAW, ILLUSTRATOR, INDESIGN, C, C++, HTML, 2D CAD, 3D CAD
Sales Cells Branch: 9371051769
Old ITI Branch: 9371151769
Pipeline Branch: 7447767169

शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
कुलस्वामिनी प्रसन्न
नगर-पुणे-नगर
आता आपल्या शहरातुन
दरमहा
- नगर वेंचुन स. ७,८,९ व दुपारी २.००
- पुणे वेंचुन स.११,१६,१ व सायं.५ वा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
पिकअप पॉईंट -पिंपरीगाव चौक,झोपडी कॅन्टीन, तपकुरा पेट्रोलपंप, एच पंप चौक,हायटेक चौक,केशव पुणे ट्रॉव्ह- बाजोरीया, खराडी बायपास,वेस्टवा, नवीन शिवाजीनगर बसस्टॉप बुकिंग आवश्यक
अमर-प्रेम हॉलिडेज
ऑफिस- पिंपळगेट,अ.नगर
9657746555/ 9226399555

EARTH's Green Library
Greenery for Every Space
Fresh Environment with Indoor Plants
Get a Plant Today!
- Potted Planters
- Premium Plants
- Garden Accessories
- Garden Furniture
- Garden Lightings

Amit Sanklecha 99231 43334
Website : greenlibrary.in
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

।। पुण्यस्मरण ।।

स्व. श्री. विशनदास रामचंद पंजाबी स्व.दि.८/१०/१९९६
स्व.श्रीमती राजकुमारी विशनदास पंजाबी स्व. दि. ७ / १० / २०१०
"तुमचे चिंतन, तुमच्या स्मृति, आम्हाला त्यांचा आधार... आमच्या प्रत्येक आचार-विचारात तुमच्या प्रेरणेचा अविष्कार.."
आपल्या पावन स्मृतीस भावपुर्ण श्रध्दांजली
* दुःखांकित *
हॉटेल संजोग । साई ट्रेडर्स । मिलन ट्रेडर्स
समस्त पंजाबी परिवार, अ.नगर

।। पाचवे पुण्यस्मरण ।।

कै.रविंद्र (पप्पूशेठ) बाबासाहेब नागरगोजे
स्व. दि. ०८/१०/२०१९
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!
तुमचे चिंतन, तुमच्या स्मृति, आम्हाला त्यांचा आधार... आमच्या प्रत्येक आचार-विचारात तुमच्या प्रेरणेचा अविष्कार...
: दुःखांकित :
श्री. माधवराव लामखडे मित्रमंडळ
नगर-पारनेर विधानसभा मतदारसंघ
एम.आय.डी.सी., अ.नगर